| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ५५ वा | शनिवार दिनांक ०२ मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

क्राईम न्युज

गोवंशीय जनावरांचे मांस वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, सोहेब शकुर कुरेशी, शाकुर इनामदार दोघे रा. सोलापूर यांनी दि. २९.०४.२०२६ रोजी तामलवाडी येथे हयुंदाई कंपनीची ॲसेट कार क्र एमएच १२ बीजी ५५५४ मध्ये ४०० किलो गोवंशीय जनावरांचे मांस विक्री करण्यासाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना तामलवाडी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क), ९ (ए) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

अवैध गांजा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रामदास ए रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२९.०४.२०२६ रोजी हुतात्मा स्मारक उमरगा येथे बेकायदेशिररित्या आर्थिक फायद्याकरिता विक्री व्यावसाय करण्याचे उद्देशाने स्वत: चे कब्जात ३४० ग्रॅम वजनाचा काळपट/हिरवट रंगाचा उग्र वास येत असलेला अंमली पदार्थ गांजा एकुण १७,००० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला उमरगा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गांजा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम ८(क), २०(ब)(ळळ) (अ) गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- भिमराव नागनाथ काळे, वय ५० वर्षेद्व रा. आंदोरा ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घराचे व त्यांचे शेजारी यांचे राहते घरात अज्ञात व्यक्तीने दि. २५.०४.२०२६ रोजी प्रवेश करुन ५१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम १,००,००० वइतर सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण ४,५४,१४५किंमतीचा माल चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भिमराव काळे यांनी दि.२९.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४),३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

धाराशिवातून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अशिष भाउ शिंदे, वय ३१ वर्षे, रा. हिंगळजवाडी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. २२.०४.२०२६ रोजी सुप्रिया बार बार्शी नाका धाराशिव च्या समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

समृद्ध,सक्षम आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र घडवण्यासाठी धाराशिव विकासाच्या नव्या युगात- पालकमंत्री प्रताप सरनाईक

धाराशिव दि.१ मे (जिमाका) महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात विकास,डिजिटल परिवर्तन, उद्योगवाढ,आरोग्य सुविधा आणि लोककल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रगतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ,सुरक्षित आणि सन्मानपूर्ण बनत असून 'समृद्ध, सक्षम आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने धाराशिव जिल्हा वेगाने पुढे जात असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

शुक्रवारी १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ६७ व्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्ताने मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना श्री. सरनाईक बोलत होते.

यावेळी स्वातंत्र्य सैनिक भास्करराव नायगावकर, बुबा साहेब जाधव श्रीमती कलावती उमरे,श्रीमती भागीरथी कुकडे, भागीरथी गुरव,जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती.अर्चना पाटील,उपाध्यक्षा श्रीमती. उषा गायकवाड,महिला व बाल कल्याण समिती सभापती पूजा शिंदे,माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,पोलिस अधीक्षक रितू खोखर,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात शासनाच्या विविध लोकाभिमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे सांगून श्री.सरनाईक म्हणाले की, प्रशासनात डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांना अधिक जलद,सुलभ आणि पारदर्शक सेवा उपलब्ध होत आहेत. 'डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड','कल्पवृक्ष स्मार्ट जीआर','जीवनरेखा' आणि 'तुळजाई चॅटबॉट' यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जमिनीचे दाखले,विविध प्रमाणपत्रे,तक्रार निवारण आणि शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत अधिक सुलभतेने पोहोचत आहे.परिणामी वेळ,श्रम आणि आर्थिक खर्चात मोठी बचत होत आहे.औद्योगिक क्षेत्रात जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून गुंतवणूक वाढीस लागली असून हजारो रोजगार संधी निर्माण होत आहेत.विविध औद्योगिक क्लस्टर प्रकल्पांमुळे 'आत्मनिर्भर धाराशिव' या संकल्पनेला अधिक बळ मिळत असल्याचे ते म्हणाले.

पालकमंत्री श्री.सरनाईक पुढे म्हणाले की,वाहतूक क्षेत्रातही राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत मोठे बदल घडत आहेत.मागील वर्षभरात धाराशिव विभागात नव्या बसेसची वाढ झाली असून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना अधिक सुरक्षित,विश्वासार्ह आणि सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध झाली आहे. लवकरच ग्रामीण भागात 'राजमाता जिजाऊ' बससेवा सुरू होणार असल्याने ग्रामीण वाहतुकीला नवी दिशा मिळणार आहे.पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत इलेक्ट्रिक बससेवा सुरू करण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीचे कामही वेगाने सुरू आहे.'आपली एसटी' मोबाईल ॲपमुळे प्रवाशांना बसचे वेळापत्रक,मार्ग आणि सेवा माहिती सहज

उपलब्ध होत आहे.असे श्री.सरनाईक यावेळी म्हणाले.

आरोग्य क्षेत्रात जिल्ह्यात ऐतिहासिक बदल घडत असल्याचे सांगून श्री.सरनाईक पुढे म्हणाले की,आधुनिक रुग्णालये, आयसीयू,एमआरआय,डायलिसिससह अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. ग्रामीण भागातही नव्या आरोग्य संस्थांची उभारणी सुरू असून आरोग्य सेवा आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत आहे.गृह,शेती आणि सामाजिक क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना,शिवभोजन योजना,उज्ज्वला गॅस योजना,मनरेगा आणि जल जीवन मिशनसारख्या योजनांमुळे सर्वसामान्यांचे जीवन अधिक सुरक्षित,सन्मानपुर्ण आणि सुलभ बनत आहे.असे त्यांनी सांगितले.

शेतकरी बांधवांसाठी कृषी,सिंचन, पीकविमा,तंत्रज्ञानाधारित शेती आणि नैसर्गिक शेती उपक्रमांमुळे शेती अधिक सक्षम होत आहे.असे सांगून श्री.सरनाईक म्हणाले की, डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे कृषी क्षेत्रातही नवे परिवर्तन घडत आहे.

धाराशिव जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून रस्ते,पाणीपुरवठा,पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या विकासकामांना गती मिळाली असून जिल्हा प्रगतीच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करत आहे.महाराष्ट्र दिन हा केवळ उत्सव नसून विकास,सामाजिक न्याय,लोककल्याण आणि आत्मनिर्भरतेच्या सामूहिक निर्धाराचा दिवस असल्याचा संदेश देत नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा.विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा आणि समृद्ध,सक्षम व प्रगत महाराष्ट्र घडवण्यासाठी हातभार लावावा,असे आवाहन पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यक्रमस्थळी आगमन होताच प्रारंभी पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी राष्ट्रध्वजारोहण केले.पोलिस पथकाने राष्ट्रगान,राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले व राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.पालकमंत्री व मान्यवरांनी शहीद स्मृती स्तंभाला पुष्पचक्र वाहिली.

पालकमंत्री श्री.सरनाईक यांच्या हस्ते कळंब तालुक्यातील शिराढोण येथील ग्राम महसूल अधिकारी विनोद चुकेवाड यांना आदर्श ग्राम महसूल अधिकारी म्हणून सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर,पत्रकार बांधव व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हणमंत पडवळ यांनी केले.

महाराष्ट्र दिनी धक्कादायक घटना: महिलेचा आत्मदहन करण्याचा प्रयत्न, प्रकृती चिंताजनक

धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव येथे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आयोजित झेंडावंदन कार्यक्रमादरम्यान एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. वेतनाच्या मागणीसाठी एका महिलेने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. या बाबत समजलेली माहिती अशी की, सदर महिलेचे नाव बीबी किशन राव पाटील (नाव समोर आलेले), ह्या भूविकास बँकेत नोकरीला होत्या. बँकेवर प्रशासक आल्यामुळे त्यांच्या नोकरीवर परिणाम झाला होता. बँकिंग क्षेत्रात समाविष्ट करून घ्यावे किंवा संपूर्ण पगार द्यावा, अशी त्यांची प्रशासनाकडे मागणी होती. मात्र, या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. अधिक समजलेली माहितीनुसार, संबंधित महिलेने २० तारखेलाच आत्मदहनाचा इशारा देणारे निवेदन दिल्याचे समजते. तरीही याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. अखेर महाराष्ट्र दिनीच्या वेळी शासकीय मध्यवर्ती इमारतीसमोर त्यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला. या घटनेत महिला सुमारे ७० टक्के भाजल्याची माहिती वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण यांनी माध्यमांना दिली. सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. दरम्यान, वेतन व प्रलंबित लाभ न मिळाल्यामुळे संबंधित महिला तीव्र मानसिक तणावाखाली असल्याचे समोर आले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, महाराष्ट्र दिनासारख्या महत्त्वाच्या दिवशी ही घटना घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दुसरी अशीच एक घटना घडली असल्याचे समोर आले आहे. एकजन आत्महत्त्या करीरत असताना ताब्यात घेतल्याचे समोर आले आहे.

मंत्र्यांचा आदेश धुळीस मिळाला! उच्च न्यायालयाचा फटका; अधिकार ओलांडल्याचा ठपका?

कळंब (प्रतिनिधी)- महसूल मंत्र्यांनी अधिकाराचा अतिरेक करत दिलेला आदेश अखेर उच्च न्यायालयाने धुळीस मिळवला आहे. कळंब येथील दत्त देवस्थानच्या जमिनीवर बेकायदा खरेदी विक्रीच्या व्यवहार करत असल्याची तक्रार प्रल्हाद किसन गुळभिले यांनी थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही केली होती. तक्रार प्राप्त होताच महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी धाराशिव चे जिल्हाधिकारी यांना तात्काळ पत्र पाठवून या प्रकरणाची सखोल चौकशी करावी व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी असा आदेश आहे महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिला होता , पण त्या आधीच हे प्रकरण औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झाले होते या या प्रकरणात कळंब येथील वादग्रस्त सर्वे नंबर ३ , ४ अ , ७ अ, ९५ अ ,९६ ,९७ अ ९८ व १०७ अ या सर्वे नंबर चा समावेश असून या प्रकरणात दिलेल्या निर्णयावर ताशेरे ओढत न्यायालयाने मंत्र्यांचा आदेश थेट रद्द करत प्रकरण पुन्हा नव्याने सुनावणीसाठी पाठवले आहे. या निर्णयामुळे प्रशासनाच्या मनमानी कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या प्रकरणात मंत्र्यांसमोर केवळ विलंब माफीचा मुद्दा प्रलंबित असताना त्यांनी थेट मूळ प्रकरणात हस्तक्षेप करत तहसीलदारांना प्रतिवादींची नावे कुळ म्हणून नोंदवण्याचे आदेश दिले होते. मात्र, हा निर्णय त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरचा असल्याचे न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले.

न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, विलंब माफीच्या अर्जावर निर्णय देणे एवढ्यापुरतेच अधिकार असताना मंत्र्यांनी मूळ प्रकरणाच्या गुणदोषांवर निर्णय देत आदेश दिला, हा अधिकाराचा स्पष्ट अतिरेक आहे. या गंभीर निरीक्षणामुळे प्रशासनातील निर्णयप्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित झाले आहेत.

महत्वाचे म्हणजे, उपविभागीय अधिकाऱ्यांनी यापूर्वीच संबंधित नोंद रद्द केली होती. त्यानंतरही मंत्र्यांनी त्या निर्णयाला बळ देत पुढील आदेश देणे हे कायदेशीर मर्यादा ओलांडणारे असल्याचे न्यायालयाने ठासून सांगितले.

उच्च न्यायालयाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी दिलेला मंत्र्यांचा आदेश १६ मार्च २०२६ रोजी रद्द करत प्रकरण पुन्हा त्यांच्याकडेच पाठवले आहे. आता मंत्र्यांना नव्याने आणि कायदेशीर चौकटीत राहून निर्णय घ्यावा लागणार आहे.

दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केले की, याचिकाकर्त्याचा अधिकार तसेच हस्तक्षेप अर्ज यावरही मंत्र्यांनी योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच, यापूर्वी दिलेला अंतरिम आदेश कायम ठेवण्यात आला आहे.

या निर्णयामुळे प्रशासनातील मनमानी पद्धतीवर लगाम बसण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हा स्पष्ट संदेश न्यायालयाने दिल्याची चर्चा सुरू आहे.या प्रकरणामुळे कळंब शहरात मोठी खळबळ उडाली आहे . ज्या नागरिकांनी या वादग्रस्त सर्वे मध्ये प्लॉटिंग खरेदी केली आहे त्यांचा जीव मात्र आता चांगलाच टांगणीला लागला आहे . पुढे काय होणार की पैसे परत मिळणार की नाही हा सवाल हे आता खरेदी दारातून उपस्थित केला जात आहे तर या विक्री करणाऱ्या लॉबीमध्ये कळंब शहरातील बड्या बड्या नेत्यांचा समावेश असल्याची ही चर्चा कळंब शहरात होत आहे . या बाबत चर्चाच जोमाने होताना दिसून येत आहे.

भूमिहीनांसाठी स्वाभिमानाची संधी: दादासाहेब गायकवाड योजनेअंतर्गत जमीन विक्री प्रस्ताव मागविले

धाराशिव (जिमाका)- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील भूमिहीन कुटुंबांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना सन २००४-०५ पासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन कुटुंबांना चार एकर जिरायती (कोरडवाहू) अथवा दोन एकर बागायती (ओलीताखालील) जमीन १०० टक्के अनुदानावर उपलब्ध करून दिली जाते.

जिल्ह्यातील पात्र भूमिहीन कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवर जमीन उपलब्ध होणे आवश्यक आहे.यासाठी जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार जमीन विक्रीसाठी प्रस्ताव सादर करावेत,असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या नियमानुसार जिरायती जमिनीसाठी प्रतिएकर कमाल ५ लाख रुपये,तर बागायती जमिनीसाठी प्रतिएकर कमाल ८ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात येणार आहे.

जमीन विक्री प्रस्ताव सादर करताना संबंधित जमीनमालकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये विहीत नमुन्यातील अर्ज,शेतजमिनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत तलाठी यांचे प्रमाणपत्र व ७/१२ उतारा,प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा सेवा सोसायटीचे थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र,कृषी पतपुरवठा करणाऱ्या बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र, मोजणी विभागाचा टाचण व नकाशासह क्षेत्रफळ अहवाल,तसेच संबंधित जमीन वादमुक्त,गहाण नसल्याचे आणि खरेदी प्रक्रियेबाबत कोणतीही नुकसानभरपाई मागणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

याशिवाय जमीन विक्री अर्जावर जमीनमालकासोबत कुटुंबातील किमान दोन सदस्यांच्या स्वाक्षऱ्या व जमीन विक्रीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.या योजनेंतर्गत जिल्हा समितीकडे सादर करण्यात आलेल्या सर्व प्रस्तावांपैकी जमीन खरेदी करणे बंधनकारक राहणार नसल्याची स्पष्ट जाणीव संबंधित जमीनमालकांनी ठेवावी,असेही प्रशासनाने नमूद केले आहे.

भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरत असून,इच्छुक जमीनमालकांनी शासन निर्णयानुसार आपले प्रस्ताव तातडीने सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

चार तारखेकडे देशाचे लक्ष

देशात नुकत्याच मतदान झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल चार मे रोजी जाहीर होणार आहेत. एनडीएच्या घोडदौडीचा कल कायम आहे का याचे पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल हे दिशादर्शक व राष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहेत. हे कळणार आहे. पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात एनडीएचे सत्तेत पुनरागमन होते किंवा नाही हे पाहणे औत्सुक्याचे असले तरी ते निकाल राष्ट्रीय स्तरावर फारसा प्रभाव टाकणारे नव्हेत. मात्र पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ व आसाम या राज्यांचे निकाल मात्र सर्वच राजकीय पक्षांची कसोटी पाहणारे आहेत. त्यातही सर्वाधिक लक्षवेधी निवडणूक पश्चिम बंगालची आहे. तेथे भाजपची थेट लढत तृणमूल काँग्रेस या प्रादेशिक पक्षाशी आहे. अन्य राज्यांपेक्षा ही अगदी निराळी स्थिती आहे. त्या राज्यात केंद्रीय निवडणूक आयोगाने राबवलेली सखोल मतदारयाद्या फेरतपासणी (एसआयआर) मोहीम वादाच्या भोवऱ्यात सापडली. ती मोहीम आसाम वगळता अन्यही राज्यांत राबविण्यात आली आणि लाखो नावे मतदारयाद्यांतून वगळण्यात आली. ते प्रकरण न्यायालयापर्यंत पोचले. न्यायालयाने नावे वगळण्यात आलेल्या मतदारांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न केला तरी त्याने परिस्थिती फारशी बदलली नाही. एकट्या पश्चिम बंगालमध्ये मतदारयाद्यांतून वगळण्यात आलेल्या मतदारांचे प्रमाण सुमारे १२ टक्के होते; तेच केरळममध्ये ३ टक्के; तर पुद्दुचेरीत ७ टक्के. तामिळनाडूत ५७ लाख नावे वगळण्यात आली. आसाममध्ये मात्र ही मोहीम इतक्या तीव्रतेने राबविण्यात आली नाही. त्यामुळे तेथे हेच प्रमाण अवघा १ टक्का होते. एकीकडे मतदार वगळले गेले; तर दुसरीकडे पाचही राज्यांत मतदान मात्र विक्रमी झाले. पश्चिम बंगालमध्ये ९३ टक्के; आसाममध्ये ८६ टक्के; तामिळनाडूत ८५ टक्के व केरळममध्ये ७८ टक्के. साहजिकच या वाढीव मतदानाचा फायदा कोणाला होणार याचे तर्कवितर्क लढविले जाऊ लागले आहेत. जोवर निकाल जाहीर होत नाहीत तोवर या वाढलेल्या मतदानाचा फायदा आपल्यालाच होणार असा दावा करण्याची मोकळीक सर्वच पक्षांना आहे. तथापि या वाढीव मतदानाच्या अन्वयार्थाचे इतके सुलभीकरण करणे उचित नाही. याचे कारण हे वाढीव मतदान का झाले याचा शोध घेणे गरजेचे. 'एसआयर' मोहिमेत त्याचे बीज दडलेले आहे. ज्यांची नावे मतदारयाद्यांत होती त्यांनी आपण मतदान केले नाही तर आगामी काळात आपलेही नाव वगळले जाऊ शकते याची धास्ती घेतली होती. साहजिकच केवळ कामगार-मजूर वर्गांतील नव्हे तर पांढरपेशी स्थलांतरित देखील यंदा मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी आपापल्या गृहराज्यात आले होते. त्याचे प्रतिबिंब वाढलेल्या मतदानात पडले. मतदानाचा टक्का वाढणे म्हणजे विद्यमान सरकारबद्दलचा कौल किंवा नाराजी असे समीकरण मांडणे घाईचे ठरेल. राजकीय अभ्यासक मिलन वैष्णव आणि जोनाथन गाय यांनी भारतात १९८० ते २०१२ दरम्यान झालेल्या १८ राज्यांच्या १२३ विधानसभा निवडणुकांच्या निकालांचा सांख्यिकी आढावा घेणारा शोधनिबंध प्रसिद्ध केला होता. त्या संशोधनानुसार, भारतात मतदानाचे प्रमाण आणि प्रस्थापितविरोधी लाट यांचा थेट संबंध आढळलेला नाही. २०१० मध्ये बिहारमधील वाढीव मतदानाचा फायदा सत्ताधाऱ्यांना झाला; तर २०११ मध्ये तामिळनाडूत वाढीव मतदान होऊनही सत्ताधाऱ्यांना पराभव स्वीकारावा लागला ही याची काही मासलेवाईक उदाहरणे. तेव्हा वाढीव मतदान हे चुरशीच्या लढतीचे लक्षण असू शकते; पण तो कोणत्याही एका पक्षाच्या विजयाचा स्पष्ट संकेत नाही. त्यामुळे निकाल लागण्यापूर्वी राजकीय पक्षांनी व समर्थकांनी हुरळून जाण्याचे कारण नाही. तथापि जे राजकीय व जमिनीवरील संकेत आहेत त्यावरून अंदाज मात्र अवश्य व्यक्त करता येतील. आसाममध्ये गेल्या निवडणुकीत भाजप आघाडी व काँग्रेसप्रणित आघाडी यांच्यातील संख्याबळातील अंतर २५ जागांचे होते. यावेळी काँग्रेसने आपली सारी ताकद तेथे ओतली आहेच; शिवाय मित्रपक्षांना बरोबर घेत आघाडी केली आहे. तेथे प्रचार हा अतिशय वैयक्तिक हल्ल्यांच्या स्तरावर उतरला होता; त्याला धार्मिक ध्रुवीकरांचे वळण मिळाले होते आणि धोरणात्मक मुद्द्यांपेक्षा भडक मुद्द्यांना प्राधान्य मिळाले होते. भाजपला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळाली मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांचा दबदबा केवळ आसाम व ईशान्य भारतातच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणातही वाढेल यात शंका नाही. प ण भाजपचा पराभव झाल्यास तो मोठा राजकीय धक्का मानला जाईल. यामुळे 'एनआरसी' आणि 'सीएए'सारख्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी कायद्यांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होईलच; शिवाय मणिपूरसारखे संवेदनशील प्रश्न अधिकच ऐरणीवर येतील. तामिळनाडूत द्रमुक आघाडीची बाजू वरचढ आहे असा अंदाज व्यक्त होत आहे. याचे मुख्य कारण अण्णा द्रमुकचे असणारे कमकुवत आव्हान. ओ पनीरसेल्व्हम यांनी अण्णा द्रमुकमधून द्रमुकमध्ये केलेला प्रवेश; त्यांच्या जातीसमुदायामध्ये अण्णा द्रमुकबद्दल पसरलेली नाराजी, शशिकला यांनी स्थापन केलेला नवीन पक्ष; परिणामतः द्रमुकविरोधी मतांमध्ये होणारी संभाव्य विभागणी; पीएमके पक्षातील फुटीमुळे त्या पक्षाचीच नव्हे तर अण्णा द्रमुक आघाडीची घटलेली ताकद; अन्नामलाई यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याने विशेषतः तरुणांमध्ये भाजपबद्दल असणारा रोष आणि गेल्या विधानसभा निवडणुकांनंतर झालेल्या पोटनिवडणुका; स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका इत्यादी अकरा निवडणुकांत ई पलानीस्वामी यांच्या नेतृत्वात अण्णा द्रमुकच्या वाट्याला आलेले अपयश यांमुळे त्या आघाडीला चमकदार कामगिरी करता येईल याची शक्यता कमीच. द्रमुकच्या पुनरागमनात अडचण आहे ती केवळ विजय यांच्या टीव्हीके पक्षाची. त्या पक्षाकडे लोकप्रिय नेतृत्व आहे हे खरे; पण अन्य पक्षांतून आयात केलेले उमेदवार; पक्ष संघटनेची वानवा; राजकीय अनुभवाचा अभाव यांमुळे त्या पक्षाला स्वबळावर सत्तेपर्यंत झेप घेता येणे कठीण दिसते. केरळममध्ये यंदा सत्तांतर होण्याची शक्यता दाट असून काँग्रेसप्रणित यूडीएफला सत्ता मिळेल असे चित्र आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक' विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग

वेग, सुरक्षितता आणि आधुनिक अभियांत्रिकीचा संगम

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.

पार्श्वभूमी : समस्येतून उपायाकडे

अडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट हा मार्ग सध्या सहा पदरी असला तरी येथे दहा पदरी वाहतूक एकत्र येते. घाटातील अवघड भौगोलिक परिस्थितीमुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो आणि काही लेन बंद कराव्या लागतात. यामुळे वेळेचा अपव्यय, अपघातांची शक्यता आणि आर्थिक नुकसान वाढते. या पार्श्वभूमीवर 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा एक पर्यायी, अधिक सुरक्षित आणि सरळ मार्ग म्हणून उभारण्यात आला आहे.

प्रकल्पाचे स्वरूप : अंतर कमी, वेळ वाचणार

या प्रकल्पाअंतर्गत खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन सरळ मार्ग तयार करण्यात आला आहे. एकूण १९.८४ कि.मी. लांबीच्या या मार्गात ५.८६ कि.मी. अंतरावर जुन्या रस्त्याचे सहा पदरीवरून आठ पदरीकरण करण्यात आले आहे, तर उर्वरित १३.३ कि.मी. पूर्णपणे नवीन मार्ग आहे. या नव्या मार्गामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किमीने कमी होणार असून, २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

अभियांत्रिकीचा अद्भुत नमुना

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद

मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकसह वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.

हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे.

मिसिंग लिंक' प्रकल्प हा आधुनिक अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. या प्रकल्पात दोन समांतर बोगदे (१.६४ कि.मी. आणि ८.९२ कि.मी.), भव्य व्हायाडक्ट, यांचा समावेश असून, वाहनांचा वेग १२० कि.मी. / तास ठेवण्याची सुविधा या मार्गावर उपलब्ध आहे.सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान

या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बोगद्यांमध्ये वॉटर मिस्ट अग्निशमन प्रणाली, स्कॅडा आधारित नियंत्रण, एएनपीआर कॅमेरे, व्हाइस इव्हॅक्यूएशन सिस्टिम, आधुनिक वायुवीजन व्यवस्था आणि एसओएस सुविधा बसवण्यात आल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

मिसिंग लिंकची व्यापक उपयुक्तता

'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अनेक महत्त्वपूर्ण लाभ अपेक्षित आहेत. प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होईल. इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे १ कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, हा प्रकल्प प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर बनवणार आहे.

कठीण परिस्थितीतही यश

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. डोंगराळ भागात बोगदे खोदणे, घनदाट वनक्षेत्रात काम करणे, मुसळधार पावसामुळे होणारे अडथळे, तसेच बोगद्यांमध्ये ऑक्सिजन पुरवठा आणि सुरक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. याशिवाय कोविड-१९ महामारीमुळे आणि काही तांत्रिक चाचण्यांसाठी परदेशी संस्थांवर अवलंबून राहावे लागले मात्र या सर्व अडचणींवर मात करत प्रकल्प यशयशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

विकासाच्या दिशेने मोठे पाऊल

मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ एक रस्ता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि दृष्टीकोन यांचा संगम आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात हा प्रकल्प महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामार्ग हे कोणत्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे असतात. मुंबई आणि पुणे ही दोन प्रमुख आर्थिक केंद्रे जोडणारा हा मार्ग उद्योग, आयटी, उत्पादन क्षेत्र आणि सेवा क्षेत्रासाठी जीवनदायिनी भूमिका बजावतो. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे या दोन शहरांमधील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असल्याने व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळणार आहे.

दळणवळण सुविधांचा विस्तार

या प्रकल्पामुळे केवळ दोन शहरांमधील अंतर कमी होत नाही, तर संपूर्ण प्रदेशातील दळणवळण सुविधांचा दर्जा उंचावतो. खोपोली, लोणावळा, कुसगाव यांसारख्या परिसरांना अधिक चांगली जोडणी मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण आणि अर्धशहरी भागांपर्यंतही विकासाच्या संधी पोहोचतील. आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या सुविधा अधिक सहज उपलब्ध होतील.

पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था

मुंबई-पुणे मार्ग हा पर्यटनासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. लोणावळा, खंडाळा यांसारख्या पर्यटनस्थळांना या मार्गामुळे अधिक वेगाने पोहोचता येईल. परिणामी पर्यटन वाढून स्थानिक व्यवसाय, हॉटेल उद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल. स्थानिक रोजगारनिर्मितीतही वाढ होईल.

शाश्वत आणि संतुलित विकास

वाहतुकीचा प्रवाह सुरळीत झाल्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल आणि इंधनाचा वापरही घटेल. यामुळे पर्यावरणावर होणारा ताण कमी होण्यास मदत होईल. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा विकासामुळे हा प्रकल्प शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरतो. मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ प्रवास सुलभ करणारा रस्ता नसून, राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महामार्ग आहे. आर्थिक वाढ, दळणवळण सुधारणा, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन या सर्व बाबींचा समतोल साधत हा प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणार आहे.

– वंदना रघुनाथराव थोरात,
वरिष्ठ सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,मंत्रालय.

वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे वेडिंग इंडस्ट्री अडचणीत: फिटिंग एक आव्हान बनले

प्रोडक्ट डिझायनर निकोल हॅमिल्टनला तिचा लग्नाचा ड्रेस मिळाला. सुंदर ए-लाइन गाऊन, हाताने बनवलेले मणी, प्रत्येक शिलाई परिपूर्ण. पण जेव्हा तिने तो ड्रेस विकत घेतला, तेव्हा तिला एका ठिकाणी सही करावी लागली. तो सामान्य कागद नव्हता, तर एक कायदेशीर दस्तऐवज होता. त्यात लिहिले होते की हा ड्रेस सध्या तिच्या शरीरावर फिट बसत नाहीये. कारण... निकोलने गेल्या काही वर्षांत वजन कमी करण्याच्या औषधांच्या (जीएलपी-१) मदतीने ५० पाउंड म्हणजेच सुमारे २३ किलो वजन कमी केले आहे. एंगेजमेंटनंतरही तिने अतिरिक्त ७ किलो वजन कमी केले आहे. ती इथेच थांबणार नाहीये.

निकोलसारख्या कथा आता अमेरिकेच्या वेडिंग इंडस्ट्रीला हादरवून सोडत आहेत. ओझेम्पिक आणि वेगोवी सारखी जीएलपी-१ औषधे इतक्या वेगाने परिणाम करतात की काही महिलांना दर दोन ते तीन आठवड्यांनी कपडे सैल होऊ लागतात. आधी ब्रायडल स्टोअर्समध्ये अशी परंपरा होती की वधू लग्नाच्या पाच-सहा महिने आधी ड्रेस निवडायची, फिटिंग व्हायची आणि सर्व काही आरामात व्हायचे. आता तो सगळा हिशोब बिघडला आहे.

अमेरिकेतील सर्वात मोठ्या ब्रायडल रिटेलर डेव्हिड्स ब्रायडलच्या सीईओ केली कुक यांच्या मते, आता अनेक वधू लग्नाच्या अवघ्या ४५ दिवसांपूर्वी ड्रेस खरेदी करायला येतात. गेल्या दोन वर्षांत 'रश ऑर्डर' म्हणजे चार आठवड्यांपेक्षा कमी वेळेत तयार होणाऱ्या ड्रेसची मागणी ५०% वाढली आहे. यासाठी कंपनीला ३,००० हून अधिक टेलरिंग तज्ञांकडून ओव्हरटाइम करून घ्यावा लागत आहे.

प्रत्येक १० पैकी १ वधू-वर जीएलपी-१ घेत आहेत, तेवढेच घेण्याचा विचार करत आहेत

वेडिंग प्लॅनिंग प्लॅटफॉर्म झोलाच्या एका सर्वेक्षणात ११,५०० हून अधिक जोडप्यांना विचारण्यात आले की ते वजन कमी करणारी औषधे घेतात का? निकाल धक्कादायक होते - या वर्षी लग्न करणाऱ्या प्रत्येक १० पैकी १ जोडप्यात कोणीतरी जीएलपी-१ औषध घेत आहे. तेवढेच लोक ते घेण्याचा विचारही करत आहेत. सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे जे लोक हे औषध घेत आहेत, त्यापैकी निम्म्याहून अधिक लोकांनी लग्नामुळेच ते घेणे सुरू केले होते.

एंगेजमेंटपासून लग्नापर्यंत वजन कमी होण्याचा अंदाज लावणे कठीण

ह्यूस्टनच्या ब्रायडल स्टुडिओच्या मालकीण नताली हॅरिस २० वर्षांपासून हे काम करत आहेत. त्या म्हणतात, 'आधी अंदाज लावणं सोपं होतं - जर वधूने ५-१० पाउंड वजन कमी केलं, तर ड्रेसमध्ये इतका बदल होईल. आता हा अंदाज लावणं अशक्य झालं आहे.' त्यांनी सांगितलं, 'काही वधू आधी सफरचंदाच्या आकाराच्या (एपल शेप) होत्या आणि आता त्यांची कंबर नाट्यमयरित्या लहान झाली आहे.' हॅरिस जीएलपी-१ औषधे घेणाऱ्या वधूंना असे ड्रेस सुचवतात, ज्यात झिपऐवजी लेस-अप बॅक असेल, म्हणजे ज्याला घट्ट किंवा सैल करता येईल. त्यांना असे कट आवडतात जे कमरेवर फ्लेअर असलेले असतील, जेणेकरून बदललेला आकार लपवता येईल.

उद्योग क्षेत्रासाठी ही इतकी मोठी समस्या का आहे?

अमेरिकेत लग्नाच्या ड्रेसची सरासरी किंमत २,२५० डॉलर (सुमारे २ लाख रुपये) आहे. डिझायनर गाऊनमध्ये ही १०,००० डॉलर (९.५ लाख रुपये) पर्यंत जाते. इतका खर्च करणाऱ्या वधू प्रत्येक शिलाईमध्ये परफेक्शन अपेक्षित करतात. हेच ब्रायडल मार्केटसाठी सर्वात मोठे आव्हान आहे. वर देखील बारीक होत आहेत. पेनसिल्व्हेनियाच्या वेंडी इयानीरी-सॅलेर्नो म्हणतात की, फक्त वधूच नाही, तर होणारे वर देखील वजन कमी करत आहेत. फरक हा आहे की पुरुषांचे सूट ऍडजस्ट करणे सोपे आहे. भाड्याने नवीन साईज मिळतो, पण ब्रायडल गाऊनची गोष्ट वेगळी आहे- तिथे प्रत्येक इंचासाठी संघर्ष असतो.

oooooooooooooooooooo

चालणे-व्यायामाप्रमाणेच फायदेशीर आहे हसणे: संशोधन सांगते की, १५ मिनिटे खळखळून हसणे एक हजार पावले चालण्यासारखे आहे

हार्वर्ड मेडिकल स्कूलचे संशोधन सांगते की तुमचे हसणे औषधांसारखे काम करते. जेव्हा वृद्ध व्यक्ती १० ते १५ मिनिटे मनमोकळेपणाने हसतात, तेव्हा त्यांच्या शरीरात तशाच प्रतिक्रिया होतात, ज्या जलद चालण्याने आणि हलक्या व्यायामाने होतात.

मानसिक आरोग्य चांगले राहते – वाढत्या वयात मनमोकळेपणाने हसल्याने होणारे ३ मोठे बदल

संशोधनानुसार, मनमोकळेपणाने हसताना वृद्धांच्या शरीरात तीन मोठे बदल होतात, जे वाढत्या वयात मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

कॉर्टिसोलमध्ये घट - हसणे तणाव वाढवणारे हार्मोन 'कॉर्टिसोल'ची पातळी कमी करते. कॅलिफोर्नियातील लोमा लिंडा युनिव्हर्सिटीच्या संशोधनानुसार, हसणे वृद्धांची स्मरणशक्ती ४०% पर्यंत सुधारू शकते, कारण ते तणाव कमी करते.

एंडोर्फिनचा स्राव - याला शरीराचे 'नैसर्गिक वेदनाशामक' म्हटले जाते. सांधेदुखी किंवा जुनाट वेदनांनी त्रस्त असलेल्या वृद्धांसाठी हसणे एक नैसर्गिक मलम आहे.

रोगप्रतिकारशक्ती वर्धक - हसण्यामुळे शरीरातील 'टी-सेल्स' आणि अँटीबॉडीजची संख्या वाढते, ज्यामुळे कोणत्याही संसर्गाशी लढण्याची क्षमता वाढते.

हे २ उपाय मदत करतील

१. बनावटी हसू– संशोधनानुसार, मेंदू खरे आणि बनावटी हसू यात फरक करू शकत नाही. जर तुम्ही एकटे असाल आणि विनाकारण हसण्याचे नाटक केले तरी, तरीही शरीरात खरे 'हॅपी हार्मोन्स'च बाहेर पडतात.

२. सामाजिक हसू – गटात हसणे ३० पट अधिक प्रभावी असते. बगीचा किंवा अशा कोणत्याही ठिकाणी लाफ्टर क्लबमध्ये सामील होणे हे वृद्धांचे एकटेपण दूर करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

रक्ताभिसरण सुधारते – तरुण दिसण्यापासून कॅलरीज बर्न होण्यासारखे ५ मोठे फायदे

फुफ्फुसांचा व्यायाम: खोलवर हसल्याने फुफ्फुसांमधील जुनी आणि दूषित हवा बाहेर पडते आणि ताजी ऑक्सिजनची पातळी वाढते. हे दमा किंवा श्वासोच्छवासाच्या समस्या असलेल्या वृद्धांसाठी उपयुक्त आहे.

हृदयाचा व्यायाम – हृदयरोगतज्ज्ञांनुसार, हसताना रक्तवाहिन्या प्रसरण पावतात. रक्ताभिसरण सुधारते आणि रक्तदाब नियंत्रित राहतो.

कॅलरीज बर्न – १० ते १५ मिनिटे हसल्याने सुमारे ४० कॅलरीज बर्न होतात, जे एका लहान वॉकच्या बरोबरीचे आहे.

झोपेत सुधारणा – संध्याकाळी मनमोकळेपणाने हसल्याने शरीर 'मेलाटोनिन' हार्मोन अधिक चांगल्या प्रकारे तयार करते, ज्यामुळे झोप गाढ आणि चांगली येते.

वृद्धत्वविरोधी – हसल्याने चेहऱ्यावरील स्नायू सक्रिय होतात, ज्यामुळे चेहऱ्यावर चमक आणि घट्टपणा येतो.

मुलांचे केस पांढरे का होतात? पांढऱ्या केसांची समस्या होण्याची कारणे

वाढत्या वयानुसार केस पांढरे होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. जेव्हा केस वेळेपूर्वीच पांढरे होऊ लागतात, तेव्हा ती चिंतेची बाब बनते. विशेषतः जेव्हा मुलांचे केस पांढरे होऊ लागतात, तेव्हा पालकांची चिंता वाढणे स्वाभाविक आहे. जर तुमच्या मुलाचे केस पांढरे होऊ लागले असतील, तर या कडे लक्ष देणं गरजेचं आहे.

मुलांचे केस पांढरे होण्याची कारणे

शरीरात पोषक तत्वांची कमतरता

मुलांमध्ये केस पांढरे होण्याचे मुख्य कारण पोषक तत्वांची कमतरता असल्याचे म्हटले जाते . डॉक्टरांच्या मते, जर मुलाच्या शरीरात आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांची कमतरता असेल, तर त्याचे परिणाम सर्वप्रथम केस आणि त्वचेवर दिसतात. व्हिटॅमिन बी१२, लोह, तांबे, जस्त आणि प्रथिने यांची कमतरता हे केस पांढरे होण्यामागील विशेषतः महत्त्वाचे घटक आहेत.

तणाव आणि झोपेचा अभाव

तज्ञांच्या मते, सध्या लहान मुलांनाही शैक्षणिक दबाव, स्क्रीनसमोर अतिरिक्त वेळ घालवणे आणि कामगिरीचा दबाव यांचा सामना करावा लागत आहे. या घटकांमुळे तणाव वाढतो आणि झोप अपुरी होते, ज्यामुळे केस पांढरे होऊ शकतात.

आनुवंशिक कारणे

मुलांमध्ये अकाली केस पांढरे होण्याची अनेक कारणे असू शकतात. अनुवांशिकता किंवा कौटुंबिक इतिहास ही सर्वात सामान्य कारणे आहेत. जर पालकांना किंवा कुटुंबातील इतर सदस्यांना अकाली केस पांढरे होण्याची समस्या असेल, तर मुलालाही ही समस्या जाणवू शकते.

रासायनिक शाम्पूचा वापर-याव्यतिरिक्त, बालरोगतज्ञांच्या मते पालक अनेकदा

आपल्या मुलांच्या केसांसाठी रसायनयुक्त शाम्पू वापरतात. यामुळे केसांचा नैसर्गिक रंगही लवकर खराब होऊ शकतो.

हार्मोनल असंतुलन

थायरॉईडच्या समस्या आणि हार्मोनल असंतुलनामुळे देखील केस अकाली पांढरे होऊ शकतात. थायरॉईडच्या समस्यांमुळे चयापचय क्रिया मंदावते आणि केसांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

केस पांढरे होण्यापासून रोखण्यासाठी, आपल्या मुलाच्या आहाराकडे आणि दैनंदिन दिनचर्येकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या शरीराला सर्व आवश्यक पोषक तत्वे मिळतील याची खात्री करण्यासाठी, त्यांच्या आहारात हिरव्या भाज्या, फळे, दूध, कडधान्ये आणि प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश करा. मुलांना पुरेशी झोप मिळेल याची खात्री करा आणि त्यांना तणावापासून दूर ठेवा. याव्यतिरिक्त, रासायनिक उत्पादने टाळा आणि केसांची चांगली स्वच्छता राखा. कोणतीही कमतरता किंवा समस्या लवकर ओळखण्यासाठी डॉक्टरांकडून नियमित तपासणी करणे देखील फायदेशीर ठरू शकते.

अस्वीकरण या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

शिक्षण केवळ साक्षरतेचा विचार नव्हे

शिक्षणबोध , संदीप वाकचौरे

शिक्षणाचा विचार करताना सातत्याने माणूस घडवणे अपेक्षित आहे. माणूस घडवणे म्हणजे नेमके काय? याचा विचार करताना मानवाचे माणसात रूपांतर करणे अपेक्षित आहे. मानवाचे रूपांतर माणसांत करायचे म्हणजे विवेक आणि शहाणपणाची वाट दर्शित करायची आहे. माणूस हा समाजशील प्राणी आहे असे अरिस्टॉटल यांनी म्हटले होते. समाजशील असण्याची प्रक्रिया ही शिक्षणातून दिल्या जाणार्या अनुभवाने विकसित करणे अपेक्षित आहे. त्याचवेळी शिक्षणातून जबाबदार नागरिक देखील घडवायचा आहे. आज समाजाला विवेकवादी चळवळीची गरज आहे. शिक्षणातून अनेक गोष्टी अपेक्षित केल्या आहेत; मात्र अपेक्षित केल्याप्रमाणे खरेच काही घडते का? शिक्षणाचा मार्ग हा विवेकवादी असावा असे म्हटले जात असताना तसे काही घडताना दिसत नाही. याचे कारण समाजात ज्या अनेक गोष्टी घडत आहेत आणि ज्या विविध प्रकारच्या घटना वर्तमानात समोर येत आहेत त्याचा विचार केला, तर शिक्षणातून यापैकी काहीच घडताना दिसत नाही. मग जे काही घडते आहे, ते नेमके काय आहे? आपल्याकडे शिक्षणाच्या नावाखाली फक्त साक्षरतेचा टप्पा पार केला जात आहे. विचार करायला शिकवणे घडत नाही. चांगले काय वाईट काय याचाही विचार करण्याची वृत्ती पुढे जाताना दिसत नाही. मग विवेकाची वाट तरी कशी सापडणार?

विवेकाची वाट म्हणजे प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सुखाची वाट. समर्थ रामदास त्यांच्या साहित्यातून प्रत्येक नागरिकाला सुखाचा पत्ता सांगू पाहत आहेत. अर्थात ते जे काही सांगत आहेत, तो केवळ सुखाचा पत्ता नाही, तर ज्या झाडाला सुखाचे फळ लागते, त्या झाडाचे नावच वाचकांना सांगून सुखाचा प्रवास घडू पाहात आहेत. समर्थांप्रमाणे संतांच्या साहित्यात अनेक ठिकाणी त्या झाडाचा उल्लेख आलेला आहे; मात्र हे झाड ज्यांना ज्यांना हाती लागते, त्याच्या आयुष्यात दुःखाची वाट कधीच तुडवावी लागण्याची शक्यता नाही. संत इतक्या पद्धतीने सुखाचा पत्ता सांगत असताना आणि झाडाचे नाव देखील सांगत आहेत. तुमच्या आमच्या आयुष्यात दुःखच असणार असेल, तर ते झाड तुमच्या आमच्या हाती नाही, असेच म्हणावे लागेल. मुळात प्रत्येकाला त्या झाडाची वाट सापडावी आणि ती वाट शिक्षणातून मार्गक्रमण व्हावी अशी अपेक्षा आहे. ते झाड म्हणजे विवेक. या झाडाला सुखाचे फळ लागणार आहे. या झाडाची फळे नेहमीच गोड असतात. विवेकाची वाट चालणारी माणसे नेहमीच प्रगतीच्या उंचीवर पोहचली आहेत, असा आजवरचा इतिहास आहे.

विवेकाची वाट

विवेकाच्या वाटेने प्रवास घडावा म्हणून सातत्याने आवाहन केले जाते. शिक्षणाची उद्दिष्टे देखील त्याच दिशेने सूचित करत आहेत; मात्र तरी विवेकाची वाट चालणे घडत नाही; मात्र अविवेकाची वाट चालणे घडते. त्यामुळे अविवेकाच्या झाडालाही फळे लागतातच, त्यात शंका नाही; मात्र ती फळे दुःखाची असतात. मुळात सुखासाठीच सर्वजण धडपड करत असतात, त्यासाठी आपण अपरिमित कष्टसुद्धा घेत असतो; पण तरी सुखाची वाट काही सापडत नाही. त्यामुळे जीवनभर आपण धावाधाव करतो आणि तरीसुद्धा जीवनात निराशेची वाट चालावी लागते. याचे कारण योग्य वाटेचा प्रवास घडण्यासाठी विवेकाची वाट सापडलेली नाही. आपल्याला जर साखर हवी असेल, तर उत्तम दर्जाचा ऊस हवा; मात्र आपण उसाचा रस काढून फेकल्यांनतर जी चिपाडे उरतात त्यातून साखर काढण्याचा प्रयत्न केला, तर फार काही हाती लागणार नाही. ढेकणाने भरलेल्या बाजेवर शांत झोप येईल का? संत म्हणतात की, ढेकणाचिया बाजा सुखाची कल्पना ही कल्पना जशी मूर्खपणाची आहे. याचे कारण कोणी तसा विचार करणार असेल, तर तो अविवेकाचाच मार्ग आहे; मात्र त्यासाठी पूर्ण विवेकी विचार करण्याची गरज आहे.

विवेकाचे मोल जर इतके असेल आणि तुमच्या आमच्या जीवनात विवेकाशिवाय जर सुखच नसेल, तर विवेकी वाट जीवनात निर्माण व्हावी, म्हणून शिक्षणातून प्रयत्न करण्याची गरज आहे. मग विवेक म्हणजे तरी काय? विवेक हा संस्कृत शब्द आहे. त्याच्या निर्मितीचा विचार करताना तो 'विच' या धातूपासून तयार झाला आहे. विच म्हणजे भेद करणे. भेद करण्याचे सामर्थ्य असणे म्हणजे विवेक असे मानले जाते. विच म्हणजे अभ्यास. प्रज्ञा निवड करण्याची क्षमता. विवेक म्हणजे विचार करण्याची क्षमता. अगदी सहजतेने बोलायचे झाल्यास विवेक म्हणजे समंजस असे म्हणता येईल. बुद्धी या शब्दासाठी प्रज्ञा, विवेक आणि बुद्धिप्रामाण्यवाद असे पर्यायी शब्द वापरले जातात. विवेकाचा अर्थ आहे कोणत्याही गोष्टीचे, वस्तूंचे खरे स्वरूप ओळखण्यास शिकणे. या विवेकाच्या साधनाने जीवनातील निर्माण होणार्या समस्यातून योग्य मार्ग काढण्यास मदत होत असते. वस्तूचे खरे अंतरंग, मूल्य ओळखणे हे शब्द फार मोलाचे व महत्त्वाचे आहेत. हे शब्द आपण कधीही विसरता कामा नये. त्यामुळे मनुष्याजवळ सारासार विवेक सदविवेक असायला हवा.

विवेकातून स्वविकास

विवेकाचा अर्थ असतो कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करणे व परिणाम समजून घेणे असते. इंद्रियांचा व मनाचा आवेग संयमित करणे. विवेक हा विचार करण्याची, योग्य व चुकीचे वेगळे करण्याची आणि परिस्थितीनुसार सुयोग्य निर्णय घेण्याची क्षमता मानली जाते. विवेक केवळ ज्ञानावर आधारित नसतो, तर अनुभव, नैतिक मूल्ये, सामाजिक परंपरा आणि अंतर्गत चेतनेवरही आधारित असतो. त्यामुळे या सर्व गोष्टी शिक्षणातून विकसित करण्याची गरज आहे. याचे कारण विवेकाची वाट चालण्यामुळे व्यक्तिगत जीवनावर देखील अत्यंत चांगला परिणाम झालेला आपणास अनुभवास येईल. विवेकामुळे निर्णय क्षमता वाढते: विवेकामुळे वेळी आणि योग्य पद्धतीने निर्णय घेण्यास मदत होते. ज्यामुळे अनावश्यक त्रास किंवा चुकीच्या मार्गावर जाण्यापासून टाळता येते. त्याचबरोबर स्व-विकास साधणे शक्य

हात आणि पाय अचानक थंड पडणे हे एका गंभीर धोक्याचे लक्षण.....

लोक अनेकदा हात आणि पाय थंड पडण्याच्या समस्येकडे सामान्य समजून दुर्लक्ष करतात. पण तुम्हाला माहित आहे का की ही स्थिती तुमच्या शरीरात विकसित होत असलेल्या एखाद्या गंभीर आजाराचे प्रारंभिक चेतावणी चिन्ह असू शकते? मिळालेल्या माहितीनुसार, हात आणि पायांमध्ये सततचा गारवा किंवा बधिरता हे अंतर्गत अशक्तपणा आणि बिघडलेल्या रक्त परिसंचरणाचे थेट लक्षण आहे.

-डडज ठए-ऊ पाणी प्यायल्यानंतरही तुमचा घसा सतत कोरडा पडतो का? हे या गंभीर आजारांचे लक्षण असू शकते

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अनेक लोकांना उन्हाळ्याच्या कडक उन्हातही या समस्येचा अनुभव येतो. जेव्हा बाहेरचे तापमान ४० अंशांपेक्षा जास्त होते आणि तुमचे हात-पाय बर्फासारखे थंड लागतात, तेव्हा हे लक्षण आहे की तुमच्या शरीराचे तापमान नियंत्रक आणि रक्ताभिसरण प्रणाली योग्यरित्या काम करत नाहीत.

-डडज ठए-ऊ सायलेंट हार्ट अटॅक'ची ही लक्षणे दुर्लक्षित करू नका

हात आणि पाय थंड का होतात?

आपल्या शरीरातील रक्ताभिसरण केवळ ऑक्सिजनच पोहोचवत नाही, तर शरीराचे तापमानही राखते. जेव्हा हृदयाद्वारे बोटांपर्यंत आणि पायांच्या बोटांपर्यंत पुरेसे रक्त पोहोचत नाही, तेव्हा ते भाग थंड वाटू लागतात. याचे एक प्रमुख कारण म्हणजे अपचन. पचनक्रिया खराब असल्यास, शरीराला पुरेशी ऊर्जा मिळत नाही, ज्यामुळे चयापचय क्रिया मंदावते आणि अवयवांपर्यंत उष्णता पोहोचण्यास अडथळा येतो.

मानसिक ताण आणि शारीरिक अशक्तपणा रक्तवाहिन्यांच्या कार्यावर परिणाम करतात. या लक्षणाकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास रेनॉडचा आजार होऊ शकतो. या स्थितीत, रक्तवाहिन्या अतिशय अरुंद होतात, ज्यामुळे रक्तप्रवाह जवळजवळ थांबतो. यामुळे व्हॅरिकोज व्हेन्ससारख्या वेदनादायक समस्या देखील उद्भवू शकतात. तुम्ही चुकीच्या वेळी लस्सी पिता का? फायद्यांऐवजी नुकसान होऊ शकते

हात आणि पाय थंड पडण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे लोह आणि व्हिटॅमिन बी१२ ची तीव्र कमतरता असू शकते. लोहाच्या कमतरतेमुळे निमिया होतो, ज्यामुळे लाल रक्तपेशींचे उत्पादन कमी होते आणि अवयवांना होणारा ऑक्सिजनचा पुरवठा बाधित होतो.

काय करावे-रक्ताभिसरण सुधारण्यासाठी, दररोज किमान ३० मिनिटे चाला. यामुळे पायांच्या रक्तवाहिन्यांमधील रक्तप्रवाह वाढतो.जर तुमचे हात आणि पाय थंड वाटत असतील, तर त्यांना कोमट तेलाने मालिश करा. यामुळे नसा उत्तेजित होतात आणि उष्णता निर्माण होते.आपल्या आहारात लोह, मॅग्नेशियम आणि जीवनसत्त्वे भरपूर असलेल्या पदार्थांचा समावेश करा. यासाठी हिरव्या पालेभाज्या आणि सुकामेवा उत्तम आहेत. उन्हाळ्यात पुरेसे पाणी प्या, जेणेकरून रक्ताची घनता योग्य राहील आणि रक्ताभिसरणात अडथळा येणार नाही. हात आणि पाय थंड पडणे हे केवळ एक लक्षण नसून शरीराने दिलेला एक संकेत असू शकतो. ही समस्या कायम राहिल्यास, घरगुती उपायांसोबतच डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.अस्वीकरण (ऊळीलश्रळाशी) : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

१ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



असं सांगितलं जातं, जेव्हा अफ्रोडाईट या प्रेमाच्या ग्रीक देवतेचा जन्म झाला, ती समुद्रातून वर आली होती. या देवतेच्या नावावरुनच ॲफ्रोडिजियाक हे नाव पडलं आहे. कामेच्छा जागृत करणाऱ्या अन्नाला अफ्रोडिजियाक म्हटलं जातं.कालवांना ॲफ्रोडिजियाक म्हटलं जातं. कालवांमध्ये मोठ्या प्रमाणात झिंक आढळतं. शरीरात टेस्टोस्टेरोनची निर्मिती करण्यासाठी झिंकचा उपयोग होतो. संशोधनानुसार, झिंकमुळे वीर्याची गुणवत्ता वाढून प्रजननक्षमतेतही वाढ होते.

२ Joke विनोद

बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.

राजू – माझ्याच वयाचे आहेत.

बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले नास!

३ Message संदेश

Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

४ Thought सुविचार

ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– डॉन प्याट

संस्कृत सुभाषित

रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।
देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।

मराठीत अर्थ

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान ५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

आडवे उत्तरे

१.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

उभे उत्तरे

१.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

चंदेरी दुनिया

अल्लू अर्जुनपासून ते हृतिक रोशनपर्यंत, भारतातील टॉप ट्रेंडसेटिंग डान्सिंग सुपरस्टार्स

नृत्य हे भारतीय मनोरंजन चित्रपटांचा नेहमीच एक महत्त्वाचा भाग राहिले आहे. त्याच्या सुरुवातीपासूनच, प्रत्येक दशकात असे अविश्वसनीय प्रतिभावान अभिनेते होऊन गेले आहे, ज्यांनी आपल्या नृत्य कौशल्याने देशाला मंत्रमुग्ध केले आहे. आपल्या हुक स्टेप्सने ट्रेंड सेट करत, ते संपूर्ण देशाचे लाडके बनले आहे. चला अशा टॉप ५ भारतीय सुपरस्टार्सवर एक नजर टाकूया, ज्यांनी आपल्या नृत्याने सातत्याने ट्रेंड सेट केले आहे.
-ङडज ठए-ऊ भारतीय मनोरंजन उद्योगातील एक प्रभावी शक्ती संजय लीला भन्साळी यांची ७ अविस्मरणीय नृत्य दृश्ये जी मनाला भिडतात
अल्लू अर्जुन-अल्लू अर्जुन हा भारतीय चित्रपटसृष्टीतील खरोखरच सर्वात उत्साही, स्टायलिश आणि डायनॅमिक नर्तकांपैकी एक आहे, जो आपल्या अविश्वसनीय नृत्य कौशल्याने प्रेक्षकांना नेहमीच चकित करतो. प्रत्येक वेळी तो पडद्यावर दिसतो, तेव्हा तो काहीतरी अनोखे घेऊन येतो आणि आपल्या उच्च-ऊर्जा, वेगवान, तरीही अचूक नृत्य हालचालींनी देशाला थक्क करून सोडतो. त्याने आपल्या नृत्याने अखिल भारतीय स्तरावर एक खोलवर परिणाम साधला आहे. तो पडद्यावर जी जादू आणतो, ती त्याला देशाचा नंबर १ डान्सिंग स्टार म्हणून वेगळे ठरवते.
एनटीआर-आपल्या अविश्वसनीय प्रतिभेमुळे, भारतातील सर्वोत्कृष्ट नर्तकांमध्ये एनटीआरचे एक विशेष स्थान आहे. आपल्या सादरीकरणात चेहऱ्यावरील हावभाव आणि उच्च-ऊर्जेच्या हालचालींचा तो ज्या प्रकारे मेळ घालतो, ते खरोखरच अतुलनीय आहे. त्याची प्रत्येक हालचाल जादुई वाटते. दक्षिण भारतीय नृत्यशैलींच्या अनोख्या मिश्रणाने त्याने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.
नरहरी झिरवाल यांनी स्वतःच आपला वादग्रस्त व्हिडिओ कसा बनवला गेला हे स्पष्ट केले
रणवीर सिंग
जेव्हा नृत्यातील खरी ऊर्जा आणि शैलीचा प्रश्न येतो, तेव्हा रणवीर सिंग सर्वोच्च स्थानी आहे. तो एका खऱ्या बॉलीवूड नर्तकाचा आत्मा मूर्त करतो. आपल्या संसर्गजन्य ऊर्जेने आणि सहज स्वॅगने तो सर्वांना आपल्या हुक स्टेप्सवर थिरकायला लावतो. त्याची चैतन्यमय उपस्थिती आणि अनोखी शैली त्याला या पिढीतील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण नर्तकांपैकी एक बनवते.हृतिक रोशन-'नृत्याचा देव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हृतिक रोशनची शैली संपूर्ण देशाला भावते. त्याचा सहजपणा, लवचिकता आणि आकर्षण यांनी नेहमीच प्रेक्षकांना मोहित केले आहे. जेव्हा जेव्हा त्याचा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होतो, तेव्हा प्रेक्षक त्याच्या नवीन नृत्यशैलीची आतुरतेने वाट पाहतात, ज्या अनेकदा ट्रेंडसेटर ठरतात. तो एक सुपरस्टार आहे, ज्याने पडद्यावर नृत्याला सातत्याने एक नवीन ओळख दिली आहे.यश. श आपल्या नृत्यातून पडद्यावर जी जादू आणतो, ती खरोखरच अद्वितीय आहे. त्याची ऊर्जा आणि हालचाली एक असे प्रभावी मिश्रण तयार करतात, जे संगीताला उत्तम प्रकारे पूरक ठरते. तो ज्या अतुलनीय तीव्रतेने सादरीकरण करतो, त्यामुळे त्याला प्रचंड चाहतावर्ग मिळाला आहे आणि तो एक सनसनाटी कलाकार बनला आहे.

राजा शिवाजी चित्रपट परीक्षण: हा चित्रपट छत्रपती महाराजांना न्याय देतो का?

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महान आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वावर चित्रपट बनवणे ही कोणत्याही चित्रपट निर्मात्यासाठी एक प्रचंड मोठी जबाबदारी असते. ही केवळ एक ऐतिहासिक कथा नाही, तर 'स्वराज्य' ही संकल्पना मनात रुजवून, त्या स्वप्नाची पूर्तता करणाऱ्या एका नायकाची गाथा आहे. राजा शिवाजी हा चित्रपट याच भावनेने साकारण्यात आला आहे; तरीही संपूर्ण चित्रपट पाहताना वारंवार अशी जाणीव होते की, या चित्रपटाची महत्त्वाकांक्षा जरी विशाल असली, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र तितकीच प्रभावी ठरली नाही.
रितेश देशमुख याने या चित्रपटात अभिनय आणि दिग्दर्शन अशा दुहेरी भूमिका पार पाडल्या आहेत. हा निर्णय निःसंशयपणे धाडसी असला, तरी चित्रपट पाहताना असे लक्षात येते की, या दोन अत्यंत जबाबदारीच्या कामांमध्ये अपेक्षित असलेला परिपूर्ण समतोल पूर्णपणे साधता आलेला नाही. चित्रपटाची मांडणी अनेक ठिकाणी मर्यादित वाटते आणि

त्याला खऱ्या अर्थाने 'पॅन-इंडिया' स्वरूप देण्यात हा चित्रपट कमी पडतो. शिवाजी महाराजांसारख्या विशाल व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करण्यासाठी आवश्यक असलेला भव्यपणा आणि विशालता या चित्रपटात पूर्णपणे दिसून येत नाही.
चित्रपटाची सुरुवात एका भव्य पटलावर होते, ज्यामध्ये शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीची राजकीय परिस्थिती दर्शविली आहे. त्यांचे वडील शहाजी भोसले यांचा संघर्ष, दख्खन प्रदेशातील सत्तासंघर्ष आणि त्या काळातील गुंतागुंतीचे राजकारण-या सर्व गोष्टी अत्यंत वेगाने आणि थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. मात्र, याच घाईमुळे चित्रपटाचा सुरुवातीचा भाग काहीसा क्लिष्ट आणि समजण्यास कठीण वाटतो. अनेक पात्रे, किल्ले आणि घटना इतक्या वेगाने पडद्यावर येतात की, प्रेक्षकांना त्यांच्याशी भावनिकदृष्ट्या जोडले जाण्यासाठी पुरेसा वेळच मिळत नाही.
चरीरींहळ
नरहरी झिरवाल यांनी स्वतःच आपला वादग्रस्त व्हिडिओ कसा बनवला गेला हे स्पष्ट केले
जसजशी कथा तरुण शिवाजी महाराजांच्या दिशेने पुढे सरकते, तसा चित्रपटाला खरा सूर गवसतो. पुरंदर, कोंढाणा आणि चाकण यांसारखे किल्ले जिंकणे-आणि त्यासोबतच जावळीच्या खोऱ्यातील मोक्याचा विजय-या घटनांमुळे चित्रपटामध्ये एक नवा उत्साह संचारतो. याच टप्प्यावर शिवाजी महाराजांचे उपजत नेतृत्वगुण आणि त्यांची दूरदृष्टी खऱ्या अर्थाने प्रकर्षाने दिसून येते. मात्र, या भागात दिग्दर्शकाचा 'क्शन' कडे असलेला कल अधिकच ठळकपणे जाणवतो. अनेक क्शन दृश्ये अतिशय 'स्टायलिश' वाटतात-कदाचित गरजेपेक्षाही जास्त-आणि यामुळे कथेचा गांभीर्यपूर्ण बाज काहीसा कमी झाल्यासारखा वाटतो.
चित्रपटाचा सर्वात वेधक आणि उत्सुकता वाढवणारा भाग म्हणजे अफजल खानाशी झालेला सामना. संजय दत्त याने आपल्या जबरदस्त 'स्क्रीन प्रेझेन्स'च्या जोरावर या पात्रात अक्षरशः प्राण फुंकले आहेत. त्याची पडद्यावरील उपस्थिती आणि त्याचे दरारा निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व-या दोन्ही गोष्टी प्रेक्षकांच्या मनावर एक कायमस्वरूपी छाप उमटवतात. शिवाजी आणि अफजल खान यांच्या भेटीचे चित्रण करणारा प्रसंग हा या चित्रपटाचा सर्वोच्च बिंदू ठरतो-हा असा एक क्रम आहे जिथे थरार, रणनीतिक चातुर्य आणि भावनिक खोली यांचा सुरेख संगम साधला गेला आहे. चित्रपटाचा जो काही कलात्मक उद्देश आहे, तो पूर्ण करण्याच्या सर्वात जवळ हा चित्रपट याच विशिष्ट भागात पोहोचल्याचे प्रकर्षाने जाणवते.
तथापि चित्रपटात अशा प्रकारच्या प्रभावी आणि प्रेरणादायी प्रसंगांची संख्या मर्यादित आहे. शिवाजी महाराजांचे जीवन हे प्रेक्षकांच्या मनात उत्साह आणि अभिमानाची भावना जागृत करण्यास समर्थ असलेल्या असंख्य क्षणांनी भरलेले आहे; तरीही, चित्रपट हे क्षण त्यांच्या पूर्ण क्षमतेने आणि ताकदीने पडद्यावर मांडण्यात अपयशी ठरतो. संवादही अनेक ठिकाणी अगदीच सामान्य दर्जाचे वाटतात; प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारे किंवा त्यांना रोमांचित करणारे असे संस्मरणीय संवाद यात क्वचितच आढळतात.
अभिनयाच्या बाबतीत बोलायचे तर, रितेश देशमुखने शिवाजीचे पात्र साकारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत; तरीही, अशा एका महान ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक असलेला करिश्मा, खोली आणि राजस डौल यात पूर्णपणे दिसून येत नाही. जेनेलिया डिसूझाने सरासरी दर्जाचा अभिनय केला आहे, तर अभिषेक बच्चनला पडद्यावर दिसण्यासाठी अत्यंत मर्यादित वेळ मिळाला आहे. दुसरीकडे, कारस्थानी बेगमच्या भूमिकेत विद्या बालनने आपली उपस्थिती ठळकपणे जाणवून दिली आहे-आणि एक वेगळाच ठसा उमटवला आहे. फरदीन खाननेही बऱ्यापैकी चांगला अभिनय केला आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारही यात छोट्या-मोठ्या सहाय्यक भूमिकांमध्ये दिसतात.
तांत्रिक बाबींकडे वळताना, हा चित्रपट संमिश्र अनुभव देतो. छायाचित्रणाने अनेक प्रसंगांमध्ये काही भव्य दृश्ये टिपली आहेत आणि ऐतिहासिक वातावरण प्रभावीपणे उभे केले आहे. मात्र, निर्मिती रचना आणि विशेष परिणाम फारसे विश्वासार्ह वाटत नाहीत. अनेक दृश्ये कृत्रिम वाटतात, ज्यामुळे चित्रपटाच्या एकूण भव्यतेला काहीसा तडा जातो. संगीत आणि गाणी फारसा प्रभाव पाडण्यात अपयशी ठरतात, तर पार्श्वसंगीत काही ठिकाणी अनावश्यकपणे खूपच कर्णकर्कश वाटते.
थोडक्यात सांगायचे तर, राजा शिवाजी हा असा एक चित्रपट आहे जो-त्याचे उद्देश कितीही महत्त्वाकांक्षी असले तरीही-अखेरीस ते पूर्णपणे साध्य करण्यात कमी पडतो. चित्रपटातील उणिवा वारंवार समोर येत असल्या तरी, शिवाजींची ही रोमहर्षक गाथा रुपेरी पडद्यावर मांडण्याचा जो प्रयत्न यात केला गेला आहे, तीच या चित्रपटाची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. जर तुम्ही या चित्रपटाकडे कोणत्याही अति-अपेक्षा न ठेवता पाहिलात, तर हा एक बऱ्यापैकी चांगला सिनेमॅटिक अनुभव देतो-जो तुम्हाला गुंतवून ठेवतो, पण तुमच्या मनावर एखादा अत्यंत खोलवर परिणाम करण्यात मात्र अपयशी ठरतो.
राजा शिवाजी (२०२६)
दिग्दर्शक: रितेश देशमुख
संगीत: अजय-अतुल
कलाकार: रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, संजय दत्त, विद्या बालन, अभिषेक बच्चन, फरदीन खान, भाग्यश्री, सचिन खेडेकर, अमोल गुप्ते, बोमन इराणी
३ तास ७ मिनिटे रेटिंग: ३/५

'लगान'चे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची 'आयएफएफआय' च्या महोत्सव संचालकपदी

लगान, स्वदेस, आणि जोधा अकबर सारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे चित्रपट निर्माता आशुतोष गोवारीकर यांची भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या (खत्रक्षख) ५७ व्या आवृत्तीचे महोत्सव संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गोवारीकर यांनी चित्रपट निर्माते शेखर कपूर यांची जागा घेतली आहे, ज्यांनी गोव्यात दरवर्षी आयोजित होणाऱ्या या महोत्सवाच्या ५५ व्या आणि ५६ व्या आवृत्तीचे नेतृत्व केले होते.
गोवारीकर यांचा आयएफएफआय (खत्रक्षख) सोबतचा संबंध अनेक दशकांपासूनचा आहे. हे चित्रपट कलेच्या आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट संस्कृतीच्या विकासातील त्यांच्या सखोल सहभागाचे द्योतक आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे.गोवारीकर म्हणाले की, या नियुक्तीबद्दल त्यांना खूप अभिमान आणि आनंद वाटत आहे. ते म्हणाले, मला या महोत्सवाची वाढ पाहण्याचा बहुमान मिळाला आहे. १९८४



मध्ये सामील झाल्यापासून ते अनेक वर्षे याच्याशी जोडले जाण्यापर्यंतचा हा एक अद्भुत प्रवास राहिला आहे. २०२४ मध्ये, मी आंतरराष्ट्रीय सिनेमासाठी ज्युरी अध्यक्ष म्हणून काम पाहिले. ६२ वर्षीय दिग्दर्शकाने सांगितले की, महोत्सवाचा वारसा पुढे नेणे हा त्यांच्यासाठी सन्मान आणि जबाबदारी दोन्ही आहे. सुशांत सिंह राजपूत प्रकरणात सहा वर्षांनंतर रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा, न्यायालयाने बँक खाती तात्काळ फ्री करण्याचे आदेश दिलेते पुढे म्हणाले, १९५२ पासून अनेक दशकांपासून असंख्य महोत्सव संघांनी जो वारसा निर्माण केला आहे, जोपासला आहे आणि वाढवला आहे, तो पुढे नेणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे.१९५२ मध्ये सुरू झालेला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा आशियातील सर्वात मोठ्या चित्रपट महोत्सवांपैकी एक आहे. जागतिक सिनेमातील सर्वोत्तम कलाकृती प्रदर्शित करण्यासाठी आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

रोहित शेट्टीच्या घरातील गोळीबार प्रकरणात पोलिसांना मोठे यश; उत्तर प्रदेशात १४ व्या आरोपीला अटक

रोहित शेट्टीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेत पोलिसांना आणखी एक यश मिळाले आहे. यूपी स्पेशल टास्क फोर्सच्या (एसटीएफ) मदतीने मुंबई क्राईम ब्रँचने १४वा आरोपी, गोलू पंडित याला उत्तर प्रदेशातून ताब्यात घेतले आहे. त्याला मुंबईत आणले जात असून तो उद्या न्यायालयात हजर होईल. ही माहिती मुंबई पोलिसांनीच दिली आहे.
आक्षेपार्ह गाण्याच्या वादानंतर नोरा फतेहीची ट्रोलर्सना प्रतिक्रिया
१४ व्या आरोपीची अटक हे तपासातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. रोहित शेट्टीच्या घरी झालेल्या गोळीबारात कथितरित्या सहभागी असलेल्यांचा शोध अधिकारी घेत आहेत. मुंबई गुन्हे शाखेचे पथक आरोपींसह शहरात दाखल झाल्यावर अटकेबद्दल आणि आरोपीच्या भूमिकेबद्दल अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे, असे पोलिसांचे म्हणणे आहे.
नरहरी झिरवाल यांनी स्वतःच आपला वादग्रस्त व्हिडिओ कसा बनवला गेला हे स्पष्ट केले
सरके चुनर' या गाण्यावरून वाद निर्माण, नोरा फतेहीविरोधात फतवा जारी
१ फेब्रुवारी २०२६ रोजी चित्रपट निर्माता रोहित शेट्टी यांच्या घरी झालेल्या गोळीबार प्रकरणी मुंबई पोलिसांनी १२ जणांना अटक केली आहे. वापरलेले शस्त्र जप्त करण्यात आले आहे. खंडणी विरोधी पथक आणि गुन्हे शाखा संयुक्तपणे या प्रकरणाचा तपास करत आहेत. जुहू परिसरातील गोळीबाराची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई टोळीने स्वीकारली असून, आता या टोळीशी असलेल्या संबंधांचा तपास केला जात आहे.

एकता कपूरने नागिन ७ बद्दल एक नवीन अपडेट दिले

टीव्हीची क्वीन, निर्माती एकता कपूरने तिच्या गाजलेल्या अलौकिक मालिका 'नागिन ७' बाबत एक महत्त्वाचे अपडेट दिले आहे. तिने पुष्टी केली आहे की, मालिकेचा सध्याचा सीझन लवकरच संपणार असून, पुढील वर्षी ती पुन्हा सुरू करण्याची योजना आखली जात आहे.
सुशांत सिंह राजपूत प्रकरणात सहा वर्षांनंतर रिया चक्रवर्तीला मोठा दिलासा, न्यायालयाने बँक खाती तात्काळ फ्री करण्याचे आदेश दिले

एकता कपूरने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर शोच्या भविष्याबद्दलच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले आणि सांगितले की सीझन संपवण्याचा निर्णय अंशतः वेळापत्रकामुळे घेण्यात आला. ती म्हणाली, नागिनबद्दल काही अपडेट्स देण्यासाठी मी इथे आहे. मित्रांनो, मी काल पोस्ट केली होती आणि माझ्या लक्षातच आले नाही की आम्ही अचानक शो संपवत आहोत.
यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी २० मे पर्यंत शेतकरी ओळखपत्र बनवणे अनिवार्य
पण हो, चॅनलच्या विनंतीमुळे आम्हाला एप्रिलमध्ये शो संपवावा लागला. आता आम्ही तो माझ्या वाढदिवशी संपवत आहोत. 'नागिन'च्या कोणत्याही सीझनची योजना नव्हती. त्यात फक्त ३० एपिसोड्स असणार होते. पण आम्ही ते ४८ एपिसोड्सपर्यंत वाढवले आणि मग पुढच्या वर्षी आम्ही परत येऊ.
इंडिया स्टोरी' २४ जुलैला प्रदर्शित; काजल अग्रवाल-श्रेयस तळपदेची नवी जोडी चर्चेत
एकताने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर आणखी एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये तिने लहान सीझन बनवण्याच्या तिच्या निर्णयाबद्दल स्पष्टीकरण दिले. ती म्हणाली, 'नागिन' दरवर्षी प्रसारित करण्यासाठी, आपण लहान सीझन बनवले पाहिजेत, जेणेकरून मला माझा सर्व वेळ द्यावा लागणार नाही आणि मी इतर कामांवर लक्ष केंद्रित करू शकेन. जर सीझन मोठा झाला, तर पुढच्या वर्षी परत येण्यासाठी आम्हाला ब्रेकची गरज लागेल. विनोद खन्ना यांची खलनायकापासून सुपरस्टार बनण्यापर्यंतची संघर्षाची आणि यशाची कहाणी
नागिन ७' चा अंतिम भाग आता ७ जून रोजी प्रसारित होईल, जो एकता कपूरचा वाढदिवस देखील आहे. सध्याच्या सीझनमध्ये प्रियांका चहर चौधरी मुख्य भूमिकेत आहे. अलीकडे, तिच्या पात्राशी संबंधित एका तीव्र प्रेम त्रिकोणावर कथा केंद्रित झाली आहे.प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्यासाठी आणि नाट्यमयता वाढवण्यासाठी, निर्मात्यांनी अंतिम भागापूर्वी अनेक नवीन पात्रांची ओळख करून दिली आहे. अंतिम भागाच्या घोषणेमुळे, पुढील वर्षी नवीन सीझनसह शो परत येण्यापूर्वी चाहते एका हाय-व्होल्टेज क्लायमॅक्सची अपेक्षा करत आहेत. 'नागिन ७' कलर्स टीव्ही आणि जिओहॉटस्टारवर उपलब्ध आहे.

३३ वर्षांनंतर पुन्हा प्रदर्शित होणार

३३ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला संजय दत्तचा आयकॉनिक चित्रपट मखलनायकफ आजही अनेकांच्या स्मरणात आहे. पण आता, ३३ वर्षांनंतर, तो खलनायक परत आला आहे. १९९३ च्या सुपरहिट चित्रपट मखलनायकफच्या सिक्वेलची घोषणा आज करण्यात आली आहे. निर्मात्यांनी चित्रपटाचा फर्स्ट लूकही प्रदर्शित केला आहे. निर्मात्यांनी आणि संजय दत्तने त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर चित्रपटाचे पहिले पोस्टर आणि फर्स्ट लूक प्रदर्शित करून मखलनायक रिटर्न्सफ्ची घोषणा केली.
फर्स्ट लूक व्हिडिओमध्ये संजय दत्त लांब केसांच्या लूकमध्ये दिसत आहे. व्हिडिओमध्ये अनेक लोक जखमी अवस्थेत पडलेले दिसत आहेत. जेव्हा संजय दत्त तिथे पोहोचतो, तेव्हा एक माणूस दयेची भीक मागतो. अक्षय कुमारच्या १३ वर्षांच्या मुलीला अश्लील संदेश पाठवून खाजगी फोटो मागितल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक तो जमिनीवर सांडलेल्या रक्ताने आणि ज्वलनशील पदार्थाने आपली सिगारेट पेटवतो. त्यानंतर तो म्हणतो, मी तुम्हाला सांगितले होते, बल्लू १० ऑक्टोबरला रात्री १० वाजता तुरुंगातून सुटेल. मग तो मखलनायकफ्चे शीर्षक गीत, नायक नाही खलनायक हूँ मैं... गात निघून जातो. हे स्पष्टपणे दिसून येते की, संजय दत्त बल्लूच्या भूमिकेत परत येईल आणि पुन्हा एकदा पडद्यावर दमदार ॲक्शन सादर करताना दिसेल. चित्रपटाचे दोन पोस्टर्सही प्रदर्शित झाले आहेत. यामध्ये संजय दत्त लांब केसांसह एका धोकादायक लूकमध्ये दिसत आहे. हे पोस्टर शेअर करताना संजय दत्तने कॅप्शनमध्ये लिहिले, प्रत्येक कथेची एक वेळ असते, आणि तिची वेळ आली आहे. खलनायक रिटर्न्स.-ङडज ठए-ऊ प्रसिद्ध ढत अभिनेता करण वाही ने सोडला अभिनय
तसेच, फर्स्ट लूकचा व्हिडिओ शेअर करताना संजय दत्तने लिहिले, काही कथा कधीच संपत नाहीत; त्या पुन्हा सुरू होतात. मात्र, चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही. हा चित्रपट जिओ स्टुडिओच्या बॅनरखाली निर्मित आहे.संजय दत्तला मखलनायक २फ ची कल्पना तुरुंगात सुचली होती. मखलनायक २फच्या टीझर आणि पोस्टर लॉंचच्या वेळी संजय दत्त म्हणाला, मला मखलनायक २फ बनवण्याची कल्पना तुरुंगात सुचली. मी तुरुंगात संगीत लावायचो आणि मखलनायकफ हा नेहमीच सर्वाधिक मागणी असलेला चित्रपट होता. म्हणून मी ४,००० कैद्यांना हात वर करायला सांगितले, की कोणाला मखलनायक २फ पाहायचा आहे, आणि त्या सर्वांनी हात वर केले. मग मी त्यांना प्रत्येकी एक पान लिहायला सांगितले. जेव्हा मी पॅरोलवर बाहेर आलो, तेव्हा त्यांनी लिहिलेल्या काही गोष्टी मला आवडल्या. मी सुभाषजींना भेटलो आणि त्यांना ते ऐकवले.



सुवर्ण परिवारातर्फे मोफत व्रतबंध कार्यक्रम

सोलापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र सुवर्ण परिवार हा सोनार समाजाचा एक राज्यव्यापी समूह असून वेळोवेळी सामाजिक बांधिलकी जपत विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत असतो. या समूहाचे प्रवर्तक , माजी कृषी अधिकारी व आयुर्वेदाभ्यासक श्री रत्नाकर वेदपाठक यांनी पांचाळ सोनार समाजातील मुलांसाठी याच सुवर्ण परिवार ग्रुप तर्फे विनाशुल्क, मोफत व्रतबंध सोहळा कार्यक्रम २०२६ आयोजित नियोजित केला असून सदर उपक्रमासाठी सर्व ग्रुप सदस्यांना ऐच्छिक यथाशक्ती नुसार अर्थसाह्याचे आवाहन केले आहे. या सुवर्णपरिवार ग्रुपने यापूर्वीही अशीच समाज उपयोगी उपक्रम म्हणजे अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत असो किंवा समाजातीलच गरजवंत सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींसाठी नोकरी उपक्रम ही राबवला होता. सुवर्ण परिवार तर्फे घेतला जाणारा हा बहुधा सोनार समाजाचा महाराष्ट्रातील पहिलाच भव्य एकमेव विनाशुल्क व्रतबंध कार्यक्रम आहे त्यामुळे अशा अभिनंदनिय उपक्रमाविषयी सर्वत्र कौतुक होत असून समाजातील इतरही तथाकथित सामाजिक संस्थांनीही अशाच पद्धतीचे अनुकरणीय समाज उपयोगी व गरजवंतांसाठी विनाशुल्क आवश्यक कार्यक्रम राबवले पाहिजेत अशी अपेक्षा जनमानसात व्यक्त होत आहे.

NSUI चा उपक्रम : NEET पेपर निमित्ताने पालकांना बसण्याची व्यवस्था व पाणी वाटप

लातूर/प्रतिनिधी : महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी म्हणून ओळख असलेल्या लातूर शहरात येत्या ३ मे रोजी होणाऱ्या NEET परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यार्थी काँग्रेस, लातूर तर्फे परीक्षा केंद्राबाहेर पालकांना बसण्याची व्यवस्था करण्यात येणार असून, उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सुमारे १० हजार पाण्याच्या बाटल्यांचेही वितरण केले जाणार आहे.

या उपक्रमाचा जास्तीत जास्त पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थी काँग्रेस, लातूर चे जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार आणि जिल्हा-उपाध्यक्ष महेश सोळंके यांनी केले आहे. यावेळी उबेद शेख, श्रवण काकडे, अबूजर शेख, कमलेश वारद, प्रथमेश राठोड आणि चैतन्य रोडे हे उपस्थित होते.

मुक्तांगणइंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

लातूर/प्रतिनिधी : लातूरमधील विशाल नगर परिसरातील मुक्तांगणइंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रपितामहात्मा गांधी यांच्याप्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेच्या समन्वयिका माधुरीवाघमारे, प्रणिता सुरवसे, सुवर्णा माळवदकर, आशा यादव, निशिगंधा सोट, गीता उन्हाळे, अरुणा राठोड,मीरा इघारे यांची उपस्थिती होती.

यावेळी शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका वशिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पायभूत सुविधा निर्मितीतून लातूर पोलीस दल आणखी सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

- लातूर सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण
- नवनियुक्त ४६ पोलीस कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वाटप
- क्यूआर कोड आधारित पेट्रोलिंग यंत्रणेचा शुभारंभ

लातूर/प्रतिनिधी : पारंपारिक गुन्हेगारी आणि सायबर गुन्हेगारीमध्ये मोठा फरक आहे. आताचा सायबर गुन्हेगार कुठेतरी दूरवर बसून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत आहे. अशा आव्हानात्मक काळात नागरिकांच्या सायबर सुरक्षिततेसाठी आणि सायबर गुन्ह्यांच्या उकलीसाठी लातूर सायबर पोलीस ठाण्याची नूतनीकृत अद्यायवत इमारत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. तसेच आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देवून पोलीस दलाला अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला लातूर पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. नव्याने पोलीस दलात भरती झालेल्या ४६ पोलीस कर्मचाऱ्यांना यावेळी नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली, तसेच जिल्हाभरात राबवण्यात येणाऱ्या 'क्यूआर कोड आधारित पेट्रोलिंग' यंत्रणेचाही शुभारंभ करण्यात आला. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संजय बनसोडे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस दलाला सुसज्ज घरे आणि आधुनिक सोयी-सुविधा देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. लातूर जिल्ह्यातही पोलिसांना नवीन घरे, पोलीस अधीक्षक कार्यालयाला सुसज्ज इमारत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. लातूर जिल्हा पोलीस दलाने गेल्या वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलिसांनी ड्रग्ज रॅकेट आणि बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अधिक सजग राहून गुन्हेगारांवर वचक निर्माण करावा, असे ते म्हणाले.

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता सायबर ठाण्यांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. लातूरमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शहरात अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना आमदार विक्रम काळे यांनी केली.

लातूर पोलीस दलाच्या लोकशक्ती रिल्स स्पर्धेला सुरुवात

सायबर फसवणूक, व्यसनाधीनता आणि वाहतूक नियम यांबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर पोलीस दलामार्फत लोकशक्ती रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माहितीपत्रकाचे अनावरण पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. रिल्स हे समाज परिवर्तनाचे साधन बनावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे, असे अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी या स्पर्धेविषयी माहिती देताना सांगितले.

लातूर शहरात क्युआर कोड आधारित पेट्रोलिंग यंत्रणा राबविण्यात येत आहे. आता हा उपक्रम जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांतर्गत राबविण्यात येणार असून यासाठी ९०७ ठिकाणी क्युआर कोड बसविण्यात आले आहेत. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी क्यूआर कोड स्कॅन करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. उपविभागीय अधिकारी समीरसिंह साळवे यांनी 'क्यूआर कोड पेट्रोलिंग'बद्दल माहिती दिली, तर सायबर पोलीस ठाण्याच्या निरीक्षक बबिता वाकडकर यांनी आजवर तक्रारदारांचे ७७ लाख रुपये परत मिळवून दिल्याबद्दल माहिती दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जिल्ह्याच्या निर्मितीपासून लातूर पोलीस दल विविध क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. येथील लोकप्रतिनिधी सदैव पोलीस दलाच्या पाठीशी उभे राहतात, ही लातूरची राजकीय संस्कृती आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी लातूर पोलीस दलाने पुढाकार घ्यावा, असे आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.

खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लातूर जिल्हा पोलीस दल कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे सांगितले.

सायबर पोलीस ठाण्याच्या नूतनीकृत अद्ययावत इमारतीमुळे सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल, असे आमदार संजय बनसोडे म्हणाले. तसेच लातूरचे पोलीस दल आव्हानात्मक परिस्थितीतही सामाजिक बांधिलकी जपत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी प्रास्ताविक केले. 'आपले लातूर सुरक्षित लातूर' उपक्रमांतर्गत लोकसहभागातून जिल्ह्यात ५१० सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. पोलीस केवळ गुन्हे उघड करत नाहीत, तर 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमातून शेतीचे वादही सोडवत आहेत, असे त्यांनी सांगितले. लातूर पोलीस लातूरकरांच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी सज्ज आणि सक्षम असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण

लातूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी आयोजित समारंभात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर पोलीस दलातील वाचक प्रमोद मोहनराव बोंडले, सहायक पोलीस उपनिरीक्षक रजनीकांत प्रल्हाद भोसले, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रवीण जीवनराव मोटेगावकर, राजेश विठ्ठलराव कंचे यांना पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या जिल्हा युवा पुरस्काराचेही यावेळी वितरण करण्यात आले. सुलेमान अफसर शेख, सृष्टी सुधीर जगताप, उदगीर येथील कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहुद्देशीय सेवाभागी संस्था यांना सन २०२४-२५ करिता जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच रामेश्वर धनराज चावरे, प्रणवी प्रधान ढवारे आणि एरंडी येथील स्वामी विवेकानंद सेवाभावी संस्था यांना सन २०२५-२६ करिता जिल्हा युवा पुरस्कार देण्यात आला.

कुमिदिनी भार्गव, अनघा अंधोरीकर, सुकेशनी बालाजी मुस्कावाड, आशा किशनराव पांचाळ यावेळी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते महिला व बालविकास विभागाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण विभागाच्या पुढारी टॅलेंट सर्च परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी अदिब रफिक सय्यद, पुनम प्रवीण कोडे, कार्तिकी रामराव जाधव यांनाही यावेळी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब - राहुल केंद्रे

अजगर मजकुरी/ नळेगाव : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोहारा गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे बोलत होते.

ते म्हणाले की, समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांनी दिलेल्या शिक्षण, स्वाभिमान आणि हक्कांच्या लढ्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांचे विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे असून समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमास गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी बाबासाहेबांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. यावेळी सरपंच महादेवी कांबळे व्यंकटराव पाटील विजयकुमार कांबळे दयानंद सोनटक्के प्रकाश हैबतपुर मोहन पाटील दयानंद सोनटक्के चंद्रकांत भारमोडे बबन धनबा उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते महापारेषणमध्ये ध्वजवंदन

महापारेषणमध्ये ६७ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्यासमवेत महापारेषणचे अधिकारी.

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते महापारेषणच्या वांद्रे येथील सांघिक कार्यालयाच्या प्रकाशगंगा इमारतीत राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी महापारेषणच्या वतीने राष्ट्रगान, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. अमित नाईक, अधीक्षक अभियंता श्री. सचिन खडगी, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, कार्यकारी अभियंता श्री. तुषार वारूळे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण इंगळे, प्रणाली विश्लेषक श्री. अतुल वारजूरकर, व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर, उपव्यवस्थापक (मानव संसाधन) श्रीमती अश्विनी तेरकर, सहायक अभियंता (स्थापत्य) श्री. अनुराग रांगणकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

रख्वाजा बंदा नवाज उर्स-ए-शरीफ २०२६ निमित्त हैदराबाद-कलबुर्गी दरम्यान ४ विशेष रेल्वे गाड्या

सोलापूर/प्रतिनिधी : दक्षिण मध्य रेल्वेने Urs-E-Shareef २०२६ निमित्त Khwaja Banda Nawaz यांच्या उर्स उत्सवासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी हैदराबाद ते कलबुर्गी (सोलापूर विभाग) दरम्यान ४ विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

हैदराबाद-कलबुर्गी उर्स विशेष (एकूण ४ फेऱ्या)

गाडी क्रमांक ०७१७७ विशेष ही गाडी कूव्वशीरलरव येथून दि. ०२.०५.२०२६ व ०५.०५.२०२६ रोजी रात्री २३:५५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०७:०० वाजता घरश्ररलीरसळ येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

गाडी क्रमांक ०७१७८ विशेष ही गाडी घरश्ररलीरसळ येथून दि. ०३.०५.२०२६ व ०६.०५.२०२६ रोजी सकाळी ०७:४० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १४:०० वाजता कूव्वशीरलरव येथे पोहोचेल. (२ फेऱ्या)

थांबे

बेगमपेट, सनतनगर, हाफीजपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, तांडूर, सेडम, मलकैद रोड, चित्तापूर आणि वाडी येथे या गाड्यांना थांबे दिले आहेत.

डब्यांची रचना

या विशेष गाड्यांमध्ये एकूण १६ डबे असतील. त्यामध्ये

२ स्लीपर क्लास

१४ सेकंड क्लास सिटिंग (यामध्ये २ लगेज कम गार्ड ब्रेक व्हॅन समाविष्ट)

आरक्षण व बुकिंग

या विशेष गाड्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच खठउढउ संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

अनारक्षित डब्यांसाठी तिकीट स्टेशनवरील काउंटरवर तसेच RailOne App द्वारे घेता येईल.

प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकीटासह प्रवास करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

विविध संस्था, संघटना पदाधिकारी नागरिकांच्या आ. अमित देशमुख यांनी घेतल्या भेटी

लातूर/ प्रतिनिधी: शुक्रवार दि. १ मे २०२६ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १ मे रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत संवाद साधला तसेच त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन निवेदने,निमंत्रनाचा स्वीकार करीत संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,कल्याण पाटील,गोविंद देशमुख, डॉ. अभय कदम, पप्पू देशमुख, राजश्री देशमुख, सचिन मस्के, दादासाहेब करपे, माधव गंभीरे, नितीन जाधव, ड.राहुल पांडे, बालाजी पाराशर, अजय वागदरे, डॉ.माधव शिंदे, सहदेव मस्के, ईनायत सय्यद, बच्चेसाहेब देशमुख, प्रा. विकास कदम, आकाश सावंत, मधुकर सांडूर, सुभाष सांडूर आदिसह काँग्रेस पक्षाचे

विविध पदाधिकारी कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

उमरग्यात वंचित बहुजन आघाडीच्यावतीने डॉ. बाबासाहेबांना प्रबोधनातून अभिवादन

उमरगा(प्रतिनिधी)-संपविला देह जरी, या धर्माच्या गारद्यांनो कशी रोखणार ही गती, शिक्षणाच्या दारात, विद्येच्या घरात घुसली... साऊ पेटती मशाल, साऊ शोषितांची ढाल... व्हता भीमराव म्हणून माय, तुझ्या बोटाला लागली शाय... यासह विविध गीतांतून शाहीर शीतल साठे, शाहीर सचिन माळी यांची विद्रोही शाहिरी जलशातून विवेकी जागर करत प्रबोधन केले.बाळासाहेबांना पाहून भीम परतून आल्यासारखे वाटते, या गाण्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रामभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शहरात जुनी जिल्हा परिषद शाळा मैदान येथे विवेकाचा जागर विद्रोही नवयान महाजलसा शाहीर शीतल साठे, शाहीर सचिन माळी यांचा समाजप्रबोधनातून महामानव डॉ. बाबासाहेब आबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अनेक वर्षांपासून समाज प्रबोधनाचे काम केले जाते. यावर्षी विद्रोही शाहीर शीतलताई साठे व शाहीर सचिन माळी, शाहीर अभयराज माळी यांचा भव्य नवयान महाजलसा कार्यक्रमातून प्रबोधन केले. निवासी जिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ. आर. डी. शेंडगे अध्यक्षस्थानी होते. वंचितचे तालुकाध्यक्ष रामभाऊ गायकवाड, माजी जिल्हा परिषद सभापती हरीश डावरे, ॲड. शीतल चव्हाण, पंचायत समिती सदस्य कैलास शिंदे, एस. के. चेले, उमरभाई शेख, बौद्धाचार्य उमेश सुरवसे, रविकिरण बनसोडे, संतोष सुरवसे आदींची उपस्थित होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान बुद्ध याचे प्रतिमेचे पूजन, दीप, धूप व पुष्पाने मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले.

वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार गीताचे व बाळासाहेब आंबेडकरांवर प्रेम करणाऱ्या तमाम जनतेच्या आग्रहाखातर विविध प्रकारचे गीत आपल्या या शाहिरीतून समाजप्रबोधनाचे काम केले. तालुक्यातील हजारो बहुजन आवर्जून उपस्थित होते.

वंचित आघाडीचे तालुकाध्यक्ष राम गायकवाड, माजी सरपंच उषा गायकवाड, महासभेचे तालुकाध्यक्ष बौध्दाचार्य उमेश सुरवसे, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, भीम अनुयायी, बहुजन समाजाचे हजारो बांधव उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अधिकाऱ्यांचा सत्कार

मुरूम (प्रतिनिधी)- उमरगा तालुक्यातील मुरूम परिसर शेतीसाठी प्रसिद्ध आहे. या भागातील काळ्या मातीतून केवळ शेतीच नव्हे, तर प्रशासनाला अनेक कर्तृत्ववान अधिकारीही लाभले आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शहरातील भीमनगर या दलित वस्तीतून तब्बल ४७ वर्ग-एक व वर्ग-दोन अधिकारी घडले असून, राज्याच्या उच्च प्रशासकीय सेवेत त्यांनी मारलेली झेप आजच्या पिढीसाठी यशाची ब्लूप्रिंट ठरत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. २८) सायंकाळी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते या कर्तृत्ववान भीमपुत्रांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त साखर सहसंचालक डी. आय. गायकवाड होते. यावेळी नगराध्यक्ष बापूराव पाटील, राजस्थानच्या राज्यपालांचे विशेष कार्याधिकारी राजकुमार सागर, अप्पर निबंधक राजेश सुरवसे, बीपीसीएलचे निवृत्त चीफ मॅनेजर सिद्धेश्वर भालेराव, मुंबई विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख यावेळी माजी मंत्री बसवराज पाटील म्हणाले की, मुरूम शहरातील भीमनगर येथून तब्बल ४७ वर्ग-एक व वर्ग-दोन अधिकारी घडले, याचा समस्त मुरूमकरांना अभिमान आहे. आज या वस्तीतील अनेक युवक-युवती उच्चशिक्षण घेऊन प्रशासकीय अधिकारी म्हणून आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडत आहेत. त्यामुळे भीमनगरची ओळख 'अधिकाऱ्यांची खाण' म्हणून निर्माण झाली आहे. खऱ्या अर्थाने भीमनगरला 'हिऱ्यांची खाण' म्हणावे लागेल. पुढील काळात शिक्षण, समता व बंधुता या मूल्यांना अधिक बळकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्वसमावेशक व भव्य स्वरूपात साजरी करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा. दत्तात्रय मुरूमकर, कोल्हापूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते बोधिसत्त्व गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जयंती मंडळाच्या पुढाकाराने प्रकाशित करण्यात आलेल्या यशस्वी शिलेदार या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी डी. आय. गायकवाड, राजकुमार सागर, राजेश सुरवसे, सिद्धेश्वर भालेराव, प्रा. दत्तात्रय मुरूमकर आणि अशोक गायकवाड यांनी डॉ. आंबेडकर शहर वाचनालयाचा उल्लेख करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच उपस्थित युवकांना स्पर्धा परीक्षा व नोकरीच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मदन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नगरसेवक रुपचंद गायकवाड, उपाध्यक्ष अमोल बनसोडे, कोषाध्यक्ष प्रा. अण्णाराव कांबळे, सचिव आनंद गायकवाड तसेच प्रशांत मुरूमकर, प्रवीण गायकवाड, प्रा. साधू गायकवाड, दिनेश भालेराव, अजिंक्य गायकवाड आदींसह कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कुंभारीत ग्रंथदिडी काढून सम्राट अशोक, म.फुले, डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

धाराशिव(प्रतिनिधी)- लोप पावत चाललेली वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथे बुधवारी चक्रवर्ती सम्राट अशोक, क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती ग्रंथदिंडी काढण्यात आली. सलग पाचव्या वर्षी महापुरुषांची आगळीवेगळी जयंती साजरी करण्यात आली.

चक्रवर्ती सम्राट अशोक, क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त ग्रंथदिंडीचे आयोजन दरवर्षीप्रमाणे यंदाही दिलपाक प्रतिष्ठान, कुंभारी यांच्या वतीने करण्यात आले होते.

या ग्रंथदिंडीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा तसेच भारतीय संविधान, 'बुद्ध आणि त्यांचा धम्म', जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची गाथा, 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक तसेच विविध महापुरुषांच्या जीवनावर आधारित ग्रंथ ठेवण्यात आले होते. ग्रंथदिंडीत अबालवृद्धांसह महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. या वेळी महापुरुषांच्या जयघोषाच्या घोषणा देण्यात आल्या.

सेवानिवृत्तीसह भरती झालेल्या तरुणांचा गौरव सकाळी तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशील, बुद्धपूजा, भीमस्मरण, भीम स्तुती अशा पद्धतीने बुद्ध वंदना घेण्यात आली. गावातील विविध क्षेत्रात काम करून निवृत्त झालेल्या नागरिकांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार तसेच पोलीस भरतीमध्ये यश मिळवलेल्या युवकाचा सत्कार करण्यात आला.

पोस्ट ऑफीस शेजारी लावलेली मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे : फिर्यादी नामे-अभिजीत बाळासाहेब वाघमारे, वय २२ वर्षे, रा. हेल्थ क्लब पोस्ट ऑफीस शेजारी धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० किंमतीची काळ्या रंगाची मोटरसायकल ही दि. २५.०४.२०२६ रोजी हेल्थ क्लब पोस्ट ऑफीस शेजारी धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अभिजीत वाघमारे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन

धाराशिव/कोल्हापूर (प्रतिनिधी)- श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी मुरलीधर गावडे (वय ५३ वर्षे) यांचे आज गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या त्या नात होत्या तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या कन्या व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कौस्तुभ गावडे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनामुळे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या गुरुदेव कार्यकर्त्यांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ताराबाई पार्क, कोल्हापूर येथील संस्थेच्या परिसरातील शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे शुक्रवार दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सकाळी ११.०० या वेळेत ठेवण्यात येणार आहे. अंत्यविधी शुक्रवार दि. १ मे २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पंचगंगा स्मशानभूमी, कोल्हापूर येथे करण्यात येणार आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी देशातील, राज्यातील शैक्षणिक, राजकीय, सामाजिक इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ साली स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये सन २००८ पासून सलग १८ वर्षे सचिवा म्हणून त्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा शैक्षणिक, सामाजिक कार्याचा वारसा समर्थपणे सांभाळला. संस्थेच्या सुमारे ४१० संस्कार केंद्रातून त्यांच्या सचिवा पदाच्या प्रशासकीय कालावधीत त्यांच्या कार्यकर्तृत्वातून शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक बदल करण्यासाठी त्यांनी नवनवीन योजना संस्थेच्या विविध शाखांमध्ये राबविल्या. इंजिनिअरींग, नर्सिंग, हॉटेल मॅनेजमेंट, आर्टिफिशीयल इंटिलिजन्स्, लॉ कॉलेज या शाखांचा शुभारंभ त्यांच्या कार्यकाळात झाला. त्यांनी संस्थेच्या विविध शाखांना गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा नावलौकिक वाढविला. संस्थेच्या विद्यार्थ्यांच्यासाठी साहित्य्, नृत्य्, नाटय्, कला, संगीत आणि इंग्रजी, फ्रेंच, संस्कृत, जर्मन भाषांच्या विकासासाठी महत्व्पूर्ण योगदान दिले. त्यांचे शिक्षणविषयक विचार समाजाच्या प्रबोधन विकासासाठी मार्गदर्शक आहेत.

त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये सहशिक्षिका, प्राचार्या व सेक्रेटरी पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांनी न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्या, राज्य शासनाच्या तेजस्विनी महिला आश्रमामध्ये शिक्षणतज्ज्ञ व महिला कल्याण समितीवर सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांना आदर्श महिला पुरस्कार, राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार, आधुनिक सावित्री पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सेमीनार मध्ये आपले शैक्षणिक विचारांसोबत कृतीशील आराखडा सादर केला.

त्यांच्या पश्चात आई, वडील, बहिण, पती, दोन मुले, सासू, सुन असा मोठा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवार दिनांक ०२.०५.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता पंचगंगा स्मशानभूमी येथो होणार आहे.

फार्मर आयडीशिवाय कृषी योजनांचा लाभ नाही ; शेतकऱ्यांनी २० मेपूर्वी नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन

धाराशिव दि.३० एप्रिल (जिमाका) राज्यात १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून,१५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे.त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकरी बांधव-भगिनींनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा,असे महत्त्वाचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एकूण ४ लाख ७७ हजार ४४ खातेदार असून त्यापैकी ३ लाख ८६ हजार ६०२ शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी नोंदणी पूर्ण केली आहे.उर्वरित शेतकऱ्यांनी शासनाच्या कृषी योजनांचा अखंड लाभ घेण्यासाठी विलंब न करता नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

फार्मर आयडी नोंदणीसाठी शेतकरी आपल्या जवळच्या सेवा सुविधा केंद्रावर भेट देऊ शकतात.तसेच ॲग्रीस्टॅक पोर्टलच्या माध्यमातून स्वतःही ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी,तसेच बियाणे,खते,औषधे आदी विविध कृषी निविष्ठा प्राप्त करण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य राहणार आहे.त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी काढून घ्यावा,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांसाठी सुवर्णसंधी : मिनी ट्रॅक्टर खरेदीसाठी ३.१५ लाखांचे अनुदान

धाराशिव दि.३० एप्रिल (जिमाका) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांच्या पुरवठ्याची महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहे.पात्र बचत गटांना कृषी व्यवसायासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

या योजनेंतर्गत बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे.तसेच संबंधित बचत गट नोंदणीकृत असावा आणि त्याचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे बंधनकारक आहे.या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या आणि योजनेंतर्गत निवड झालेल्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर तसेच त्याची उपसाधने (कल्टीव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर) खरेदीसाठी कमाल ३.१५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे.

जिल्ह्यातील इच्छुक व पात्र अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचत गटांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे ३० जून २०२६ पर्यंत ऑफलाईन अर्ज सादर करावेत.

अर्जासोबत सर्व सदस्यांचे जातीचे दाखले,आधार कार्ड व रहिवासी दाखले ही आवश्यक कागदपत्रे कार्यालयीन वेळेत जमा करणे आवश्यक आहे.अधिकाधिक पात्र बचत गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव येथील सचिन कवले यांनी केले आहे. ही योजना ग्रामीण भागातील बचत गटांना स्वावलंबनाची नवी दिशा देणारी ठरणार आहे.

पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान भुम पोलीसांनी दि.२९.०४.२०२६ रोजी . भुम पोलीस ठाणे हद्दीत बसस्थानक भुमच्या बाजूस छापा टाकला. यावेळी इंद्रजित रा. कसबा ता. भुम जि. धाराशिव हे १७.३० वा. सु बसस्थानक भुमच्या बाजूस कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,१२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले भुम पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

भूमच्या १५ नगरसेवकांचे उपोषण

भूम,(प्रतिनिधी)- पालिकेतील कथित अनियमितता, भ्रष्टाचार आणि मनमानी कारभाराच्या निषेधार्थ जनशक्ती शहर विकास आघाडीच्या १५ नगरसेवकांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. यापूर्वी १७ एप्रिल रोजी नगरसेवकांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा नगर प्रशासन अधिकाऱ्यांकडे विविध गंभीर मुद्द्यांवर सविस्तर निवेदन सादर केले होते. मात्र, त्या निवेदनाची अद्याप दखल न घेतल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नगरसेवकांनी दिलेल्या निवेदनानुसार मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत घनकचरा व्यवस्थापन कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित देयके तत्काळ थांबवून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. आहे. तसेच प्रभारी मुख्याधिकारी प्रवीण जाधव यांनी दलितेतर वस्ती सुधार योजना (२०२४-२५) व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागर ोत्थान योजनेंतर्गत सर्वसाधारण सभेचा ठराव न घेता प्रशासकीय मान्यता दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ही कामे रद्द करून नव्याने सभेच्या ठरावाद्वारे मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली आहे. वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२२-२३ अंतर्गत कसबा क्रीडांगण विकास कामामध्ये मुदत संपल्यानंतरही नियमबाह्य देयके अदा करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित तत्कालीन मुख्याधिकारी, नगर अभियंता व लेखापाल यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरथोत्थान योजनेंतर्गत सुमारे ११४ कोटी रुपयांच्या सिमेंट रस्ते कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, चौकशीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत आज सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनात उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे, गटनेते रुपेश शेंडगे, बांधकाम सभापती अनिल शेंडगे, नवनाथ रोकडे, रामराजे कुंभार, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड, विठ्ठल बागडे, यशवंतभय्या थोरात, शमशाद हरून मुजावर, शीतल अमोल गाडे, चंद्रकला हरिचंद्र पवार, सुनिता गणेश वीर, नूरजहाँ महंमद इसार मणियार व सुरेखा दत्तात्रय काळे हे नगरसेवक सहभागी झाले आहेत.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649